# महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे व भारत फोर्ज लि. पुणे
## संयुक्त उपक्रम

KALYANI

### चासच्या ठाकरवाडीत दवाखाना : 'भारत फोर्ज'चा पुढाकार
## आदिवासी बांधवांसाठी टेलिमेडिसिन



चास-ठाकरवाडी (ता. आंबेगाव) : भारत फोर्जने सुरू केलेल्या टेलिमेडिसिनच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उद्योजक सचिन भोर.

वृत्तपत्राने घेतलेली दखल.

## टेलिमेडिसीन दवाखाना
मौजे ठाकरवाडी (चास), ता. आंबेगाव, जि. पुणे.






दवाखान्याचे उद्घाटन करतांना भारत फोर्ज- सिएसआर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे, मा. गटविकास अधिकारी श्री. जालींधर पठाडे व युवा उद्योजक श्री. सचिन भोर

मौजे ठाकरवाडी येथील आरोग्य विषयक अडचणी व गरज लक्षात घेऊन डोअर स्टेप हेल्थ सर्व्हिसेस, पुणे यांच्या तंत्रसहाय्याने माहे, ऑगस्ट २०२२ पासुन हा दवाखाना चालु करण्यात आला आहे. प्रशिक्षित नर्स च्या मदतीने ऑनलाईन डॉक्टर व रूग्णांचे थेट संभाषण करून डॉक्टरांच्या सुचनेनुसार तपासणी व आवश्यक औषधोपचार केले जातात. माहे, जानेवारी २३ अखेर एकुण ८८० रूग्णांनी या दवाखान्याचा लाभ घेतलेला आहे. आठवड्यातील दोन दिवस गावातील वेगवेगळ्या वाड्या-वस्त्यांवर नर्स भेट देतात व तेथील विशेषतः वयोवृद्ध व लहान रूग्णांची तपासणी केली जाते. ग्राम स्थांसाठी या दवाखान्यात विविध आरोग्य विषयी ऑनलाईन मार्गदर्शन व व्यायाम कार्यशाळा ही आयोजित केल्या जातात.

भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे

रूग्ण तपासत असतानाची काही क्षणचित्रे.







# महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे संचलित

## भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प,

डिंभे, ता. आंबेगांव, जि. पुणे ४१०५०९

ई- मेल mamtdp@gmail.com, फोन – ९४२१७४०२३३


जावक क्र. मआमं./भी.आ.वि.प्र./प्रशासन/२०२४-२७ दि. १३/०४/२०२४

**प्रति.**
**मा. श्री. अनिल गुजर,**
**सचिव, महाराष्ट्र आरोग्य मंडळ,**
**माळवाडी, हडपसर, पुणे-२८**

**विषय :-भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडीचा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल सादर करणेबाबत...**

**महोदय,**

**भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडी मध्ये सन २०२३-२४ या कालावधीत झालेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे देत आहोत.**

## भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे :

### १. ज्ञानदा प्रशिक्षण केंद्र :



अहवाल कालावधीत ज्ञानदा प्रशिक्षण केंद्रात विविध संस्थांमार्फत एकुण २० दिवसांत १२ प्रशिक्षणे/बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये एकुण ४२१ सहभागी उपस्थित होते. या प्रशिक्षण केंद्रात घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा व बैठकांचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे :

| अ. क्र | दिनांक | कालावधी (दिवस) | प्रशिक्षण/बैठक आयोजित करणारी संस्था | प्रशिक्षणाचे नाव | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २० एप्रिल २३ | १ | भारत फोर्ज लि पुणे, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, कृषि विज्ञान केंद्र बारामती | शेळी पालन, फळ, भाजीपाला प्रक्रिया प्रशिक्षण | ८० |
| २ | ११ मे २३ | १ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ | मुक्तांगण वसतीगृह मुली व पालक मुलाखती | ५५ |
| ३ | २२ ते २३ जुलै २३ | २ | जनजाती (वनवासी) कल्याण आश्रम | कार्यशाळा | ५६ |
| ४ | ११ ते १२ ऑगस्ट २३ | २ | आय.सी.ए.आर.-सी. आय.एफ.ई, मुंबई | अभ्यास सहल | ०६ |
| ५ | १२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट | ४ | श्री. सिद्धेश्वर जामगे मित्र परिवार | अभ्यास सहल | २३ |

| अ. क्र | दिनांक | कालावधी (दिवस) | प्रशिक्षण/बैठक आयोजित करणारी संस्था | प्रशिक्षणाचे नाव | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ६ | १९ ऑगस्ट २३ | १ | श्रीमती जुन फर्नान्डीस, मुख्याध्यापक डॉ. दादा गुजर इंग्लिश मिडिअम स्कुल, हडपसर | अभ्यास सहल | ४० |
| ७ | ९ सप्टेंबर २३ | १ | इंजिनिअरींग कॉलेज, मांजरी पुणे | अभ्यास सहल | २० |
| ८ | ३० सप्टेंबर २३ | १ | श्री. अशोक चौधरी मित्र परिवार | अभ्यास सहल | ०९ |
| ९ | ६ ते ७ जानेवारी २४ | २ | इंडो सायन्स एज्युकेशन ट्रस्ट, हडपसर, पुणे | कार्यशाळा | २७ |
| १० | २० जानेवारी २४ | १ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व फिनास्त्रा आयटी कंपनी | प्रकल्प भेट | २० |
| ११ | १८ ते १९ फेब्रुवारी २४ | २ | जनजाती कल्याण आश्रम, पुणे | कार्यशाळा | ४० |
| १२ | १५ ते १६ मार्च २४ | २ | अफार्म संस्था, पुणे | कार्यशाळा | ४५ |
| एकुण | | २० | एकुण | | ४२१ |

अहवाल कालावधीत ज्ञानदा प्रशिक्षण केंद्राची वेळोवेळी साफसफाई करण्यात आली तसेच इलेक्ट्रिक दुरूस्ती, दरवाजे दुरूस्ती व इतर किरकोळ दुरूस्त्याही करण्यात आल्या.

## २. पदरवाडी जनसेट प्रकल्प :-

अहवाल कालावधीत पदरवाडी जनसेट प्रकल्प व्यवस्थित चालु असुन पदरवाडीतील एकुण १३ कुटुंबे भात भरडणे व दळण दळण्यासाठी त्याचा वापर करत आहेत.

अहवाल कालावधीमध्ये पदरवाडी ग्रामस्थांनी खालील तपशीलनुसार जनरेटर व गिरणीचा वापर केलेला आहे.

| अ.क्र | एकुण | | एकुण भात भरडणे (किलो) |
|---|---|---|---|
| | तास | मिनीटे | |
| १ | ८८ | ०० | १४२०० |

दि. ७ नोव्हेंबर २०२३ रोजी कमिन्स कंपनीचे श्री. विकास साळवे व श्री. सचिन जोशी यांनी पदरवाडी येथे भेट देऊन तेथील ग्रामस्थांसोबत जनसेट प्रकल्पाबाबत चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत संस्थेचे आकौंट ऑफिसर श्री सागर मिटकरी हे उपस्थित होते.

## ३. आदर्शगाव संकल्प व प्रकल्प फदालेवाडी-उगलेवाडी :-

आदर्शगाव प्रकल्प पुर्ण झाला असला तरी संस्थेने गावात ग्राम विकासाची कामे चालु ठेवावीत व बचत गट हिशोब व जिवनाधार उपक्रमातील फिरता निधी यावर संस्थेमार्फत नियंत्रण ठेवावे, अशी मागणी गावकऱ्यांकडुन दि. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत केली होती. संस्थेमार्फत सदर विषयास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार प्रत्येक महिन्यास गटांसोबत चर्चा करून मासिक हिशोब केला जातो. त्यामध्ये कर्ज वसुली, बचत, व्याज दंड, कर्ज वाटप इ. चा सविस्तर तपशील संस्थेने तयार केलेल्या हिशोब रजिस्टर मध्ये भरण्यात येतो.

गावात एकुण २० बचत गट (महिला बचत गट-१८ व पुरूष बचत गट-२) चालु असुन एकुण सदस्य संख्या २८७ इतकी आहे. सन २०२३-२४ या वर्षातील मार्च २०२४ अखेरीज सर्व बचत गटांचा एकत्रित आढावा पुढीलप्रमाणे :

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| तपशील | रक्कम (रू.) | तपशील | रक्कम (रू.) |
| बचत | २३,९१,७०० | कर्ज वाटप | ६७,७७,६४७ |
| कर्ज परतफेड | ३८,८७,२८९ | बँक कर्ज परतफेड | ७,६३,९०० |
| सेवाशुल्क | ११,७६,२५५ | बँक कर्जावरील व्याज | ३१,२२९ |
| दंड | २०,२५० | इतर खर्च | ९६,५४१ |
| बँक व्याज | ४३,३९९ | नफा/ बचत परत | ३,३४,००० |
| इतर | ३,५१,८९३ | फिरता निधी फेड | ७,८५,०८४ |
| बँक कर्ज | १०,१०,००० | फिरता निधी व्याज | ७,०२८ |
| फिरता निधी | १२,४०,००० | हातात शिल्लक | १४,३६३ |
| | | बँक शिल्लक | १३,१०,९९४ |
| **एकुण** | **१,०१,२०,७८६** | **एकुण** | **१,०१,२०,७८६** |

**उपजिविका उपक्रम :**

आदर्शगाव प्रकल्पांतर्गत उपजिविका उपक्रमांतर्गत बचत गटांना फिरता निधीकरिता रू. ७,७८,०००/-इ. निधी प्राप्त झाला होता. हा वाटप केलेला निधी बचत गटांकडुन परतफेड झाल्यावर पुन्हा वाटप करण्यात येतो.



आदर्शगाव प्रकल्पातील उपजिवीका उपक्रमांतर्गत बचत गटांना उदयोग-व्यवसायासाठी फिरता निधी वाटप केला जातो. फिरता निधीचे वाटप व परतफेड यशस्वीरित्या चालु असुन परतफेडीच्या रक्कमेतुन बचत गटांना गरजेप्रमाणे पुन्हा-पुन्हा रक्कम वाटप केली जाते. त्यासाठी बचत गट ग्रामपंचायतीकडे निधी मागणी अर्ज जमा करतात. जमा झालेल्या अर्जावर ग्रामसभेत चर्चा केली जाते. दि. १५ ऑगस्ट २०२३ च्या ग्रामसभेत खालील प्रथम ५ बचत गटांच्या व दि. २६ जानेवारी २०२४ च्या ग्रामसभेत उर्वरित ५ बचत गटांच्या कर्ज मागणी अर्जावर चर्चा करून खालील तपशीलनुसार बचत गटांना निधी मंजुर करण्यात आला व देण्यातही आला आहे.

| अ.क्र. | बचत गटाचे नाव | निधी रक्कम |
|---|---|---|
| १ | समर्थकृपा बचत गट, घमाचीवाडी | ५०,००० |
| २ | आदिनाथ बचत गट, घमाचीवाडी | ५०,००० |
| ३ | जागृती बचत गट, जळकेवाडी | ५०,००० |
| ४ | प्रेरणा बचत गट, तातळेवाडी | ५०,००० |
| ५ | मुक्तादेवी बचत गट, उगलेवाडी | ५०,००० |
| ६ | कमला बचत गट, जळकेवाडी | ५०,००० |
| ७ | परिवर्तन बचत गट, तळेपठार | ५०,००० |
| ८ | औदुंबरेश्वर बचत गट, तळेपठार | ५०,००० |
| ९ | जागृती बचत गट, फदालेवाडी | ५०,००० |
| १० | हिरकणी बचत गट, जळकेवाडी | ५०,००० |
| | **एकुण** | **५,००,०००** |

उपजिवीका उपक्रमांतर्गत बचत गटांना उदयोग-व्यवसायासाठी सुरूवातीपासुन वाटप केलेल्या एकुण फिरत्या निधीचा मार्च २०२४ अखेरचा एकुण वाटप-परतफेड तपशील खालीलप्रमाणे :

| बचत गटांना एकुण वाटप निधी रू. | बचत गटांकडुन एकुण परतफेड रू. | बचत गटांकडुन एकुण येणे बाकी रू. |
|---|---|---|
| २१,२८,००० | १५,९१,९४५ | ५,३६,०५५ |

## ४. भारत फोर्ज लि. पुणे – गाव विकास कार्यक्रमः

भारत फोर्ज कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीअंतर्गत आंबेगाव तालुक्यातील मौजे ठाकरवाडी, कोळवाडी–कोटमदरा, फदालेवाडी–उगलेवाडी, गंगापुर खर्द, चपटेवाडी, चिखली, दस्तुरवाडी, फुलवडे, वडगाव–काशिंबेग–वाळुंजवाडी, नानवडे–तिरपाड, पिंगळवाडी व आमोंडी या १२ गावांमध्ये गाव विकास प्रकल्पामार्फत कामे चालु आहेत. सदर गावांमधील करण्यात आलेल्या कामांचा अहवाल खालीलप्रमाणे :

### १) ठाकरवाडी गाव विकास प्रकल्प :

### अ. टेलिमेडिसीन दवाखानाः

मौजे ठाकरवाडी (चास) याठिकाणी वैद्यकीय तसेच प्राथमिक आरोग्याविषयी सुविधा गावातच उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांना चास, महाळुंगे पडवळ, घोडेगाव याठिकाणी जावे लागते. प्राथमिक आरोग्याची सुविधा गावातच उपलब्ध व्हावी, यादृष्टिकोनातुन टेलिमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर उपलब्ध असुन रूग्णांसोबत व्हिडीओ कॉलींगद्वारे चर्चा केली जाते व नर्सद्वारे रूग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले जातात.



या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रूग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलिमेडिसीन स्टाफ काही ठरावीक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रूग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **अहवाल कालावधीत दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर दवाखान्यात एकुण १६७७ रूग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन **विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा** आयोजित केल्या जातात, यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना, ठाकरवाडी याठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | एकुण लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ५४ | ३१३ |

टेलेमेडिसीन दवाखान्यामार्फत अहवाल कालावधीत खालील तपशीलनुसार हिमोग्लोबीन चेकअप आयोजित करण्यात आले होते.

| अ.क्र. | दिनांक | तपासणी संख्या |
|---|---|---|
| १ | २५ मे २०२३ | ७ |
| २ | २४ ऑगस्ट २०२३ | ८ |
| ३ | २४ नोव्हेंबर २०२३ | ८ |
| | एकुण | २३ |

दि. १३ डिसेंबर २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्याअंतर्गत बालदिनानिमित्त जि. प. शाळा ठाकरवाडी गावठाण याठिकाणी शालेय अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये संगीतखुर्ची, चमचा लिंबु व पोतीउडी इ. ३ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. शाळेतील सर्व एकुण ३३ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेवून आनंद घेतला. विजयी प्रथम तीन क्रमांतील विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी टेलेमेडिसीन स्टाफ जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.





## आ. माती नाला बांध दुरूस्ती :

मौजे ठाकरवाडी (वडाचीवाडी) येथील माती नाला बांध खोलीकरण व दुरूस्ती करण्याचे नियोजित होते. त्यानुसार दि. २० मे २०२३ रोजी सरपंच श्री. बबन बारवे यांच्या हस्ते नारळ फोडुन या कामास सुरूवात करण्यात आली होती. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य श्री. खंडु पारधी, माजी उपसरपंच अनिल जाधव तसेच संस्थेचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

अहवाल कालावधीत बंधाऱ्याचे खोलीकरण–रूंदीकरण, बांध बंदिस्तीचे, दगडी पिचींग, सांडवा बांधकाम ही सर्व कामे पुर्ण झाली असुन सदर कामाचा बोर्ड ही बसविण्यात आला आहे. अहवाल कालावधीत या बंधाऱ्यामध्ये पावसाचे पाणी जमा होऊन बंधारा पुर्णपणे भरला होता. या बंधाऱ्याची पाणी साठवणुक क्षमता २१ टीसीएम इतकी झाली असुन दुबार पिके घेण्यासाठी साधारणतः ३०० शेतकऱ्यांच्या अंदाजे २०० एकर जमीनीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा होईल.







## इ. शाळा बांधकाम :

मौजे ठाकरवाडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जांभळेमळा या शाळेची दोन वर्गखोल्या असलेली कौलारू जुनी इमारत मोडकळीस आली होती. पंचायत समिती कडुन दुरूस्ती करिता काही निधी मंजुर होता, याचबरोबर ग्रामस्थांनी या इमारतीची नव्याने पुर्नबांधणी व्हावी, यासाठी देणगी स्वरूपाने काही निधी जमा केला व आरसीसी मध्ये नवीन २ वर्गखोल्या बांधकाम केल्या. परंतु पुढील कामास कोणताही निधी उपलब्ध नसल्याने या खोल्यांचे प्लास्टर करणे, फरशी बसविणे, दरवाजे–खिडक्या बसविणे इ. कामे आपुरी राहिली होती.

आपुऱ्या कामामुळे विद्यार्थ्यांना शाळेकरिता वर्गखोल्या उपलब्ध नसल्याने इ. १ ते ४ थी पर्यंतचे सर्व वर्ग एकाच सार्वजनिक शेड मध्ये भरविण्यात येत होते.

वरील सर्व परिस्थितीबाबत भारत फोर्ज च्या सिएसआर प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्यासोबत चर्चा केली असता त्यांनी लगेचच या पुढील कामास मंजुरी दिली व दि. १० जुलै २०२३ पासुन या शाळेच्या पुढील कामास सुरूवात करण्यात आली. माहे जुलै ऑगस्ट या कालावधीत शाळेच्या दोन वर्गखोल्यांचे प्लॅस्टर करणे, दरवाजे-खिडक्या बसविणे, टेरेस भिंत, वॉटरफ्रुप करणे, फरशी बसविणे, ब्लॅकबोर्ड तयार करणे व रंगकाम करणे इ. सर्व कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. (काम करण्यापुर्वीचा व नंतरचे फोटो)





**ई. वनजमीनीवर वृक्षलागवड:**

मौजे ठाकरवाडी गावातील नंबरवाडी येथे गाव विकास कार्यक्रमांतर्गत वनजमीनीवर वृक्ष लागवड करण्याचे नियोजित होते. त्यानुसार अहवाल कालावधीत वनविभाग रोपवाटीका कळंब व खरपुडी याठिकाणावरून एकुण २४०० रोपे आणण्यात आली व मजुरांच्या मदतीने वनजमीनीवर एकुण २२५० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये साग, बांबु, कवठ, शिसव, बेल, करंज, जांभुळ, आवळा, कांचन, वाळवा, मोह, लिंब, पिंपळ, कढीपत्ता, दोभण इ. प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आलेली आहे .





वृक्ष लागवड करतेवेळी मा. वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती राजहंस मॅडम मंचर यांनी भेट देऊन वृक्षारोपण व इतर कामांची पाहणी केली व वृक्षारोपण संबंधी मार्गदर्शन केले.

या झाडांना पाण्याची सोय व्हावी या करिता वनजमीनीवरील विहीरीपासुन पाईपलाईनचे काम करून पाण्याच्या २ टाक्या बसविण्यात आल्या आहेत. तसेच सर्व झाडांना ड्रीप सिस्टीम बसविण्यात आली आहे. झाडांच्या संरक्षणाकरिता सर्व बाजुने लोखंडी जाळीचे कंपाऊंड करण्याचे ही काम पुर्ण करण्यात आले आहे.






दि. ९ जानेवारी २०२४ ते १४ जानेवारी २०२४ या कालावधीत ठाकरवाडी गावातील महिला मजुरांच्या सहाय्याने कंपाऊंड अंतर्गत सर्व गवत काढण्यात आले. आवश्यकतेनुसार सर्व झाडांना ड्रीपद्वारे पाणी सोडण्यात येत आहे. तसेच ड्रिप सिस्टिमचा फिल्टर वेळोवळी काढुन स्वच्छ–साफ करण्यात येतो.

## उ. जि. प. शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यासाठी पोषण आहार :

पोषण आहार अंतर्गत मौजे ठाकरवाडी येथील ४ जि.प. शाळा व ५ अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांकरिता पोषण आहार अंतर्गत दि. २ जानेवारी २०२४ पासुन दरदिवस प्रत्येकी शेंगदाणा–गुळाचा १ लाडु व १ उकडलेले अंडे देण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे. अंगणवाडी सेविकांचा संप चालु होता. संप सपंल्याने व अंगणवाडी शाळा सुरू झाल्याने दि. २९ जानेवारी २०२४ पासुन अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना ही पोषण आहार सुरू करण्यात आला आहे. मार्च २०२४ अखेर विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे एकुण १८,३४० लाडु व एकुण १७,२०७ अंडी पुरविण्यात आलेली आहेत.



| अ..क्र | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | शेंगदाणागुळ लाडुंची संख्या | एकुण अंड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जि. प. शाळा जांभळेमळा | २७ | १,९१७ | १,८३६ |
| २ | जि. प. शाळा, ठाकरवाडी गावठाण | ३३ | २,३४० | २,२४३ |
| ३ | जि. प. शाळा कोंबडवाडी | २५ | १,८७२ | १,७९१ |
| ४ | जि. प. शाळा नंबरवाडी | १०७ | ७,५३१ | ७,२१३ |
| ५ | अंगणवाडी शाळा, जांभळेमळा | १३ | ८२३ | ७९४ |
| ६ | अंगणवाडी शाळा, पिराचीवाडी | १५ | ७३५ | ७१० |
| ७ | अंगणवाडी शाळा, ठाकरवाडी | २८ | १,२१६ | ९८४ |
| ८ | अंगणवाडी शाळा, कोंबडवाडी | १५ | ६९० | ६५२ |
| ९ | अंगणवाडी शाळा, नंबरवाडी | २८ | १,२१६ | ९८४ |
| | **एकुण** | **२९१** | **१८,३४०** | **१७,२०७** |

## ऊ. फळबाग लागवड :

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे ठाकरवाडी येथील एकुण ७४ लाभार्थ्यांना १०११ आंबा रोपे (केशर–४९२+हापुस–५१९) वाटप करण्यात आले आहेत. तसेच जि. प. शाळा नंबरवाडी या शाळेस एकुण २ झाडे (केशर) देण्यात आली आहेत. याप्रमाणे एकुण १०१३ आंबा रोपांचे वाटप करण्यात आले आहे.






## २) कोळवाडी–कोटमदरा गाव विकास प्रकल्प :

### अ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे कोळवाडी–कोटमदरा या गावात सन २०२३–२४ या कालावधीत एकुण १५ लाभार्थी शेतकऱ्यांच्या पडीत जमीनीच्या सपाटीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. ५ लाभार्थ्यांचे काम माहे जुन २०२३ मध्ये तर उर्वरित १० लाभार्थ्यांचे काम मार्च २०२४ अखेर पुर्ण करण्यात आले आहे. सदर सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीचे मोजमाप घेण्यात आले आहे. मोजमापानुसार **एकुण १८५.५२ गुंठे** जमीन लागवडीयोग्य झाली आहे. (लाभार्थी शंकर भिमाजी गिजरे यांचा सपाटीकरण कामापुर्वीचा व काम झाल्यानंतरचा फोटो.)





### आ. जि. प. शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार:

पोषण आहार अंतर्गत मौजे कोटमदरा येथील जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांकरिता दि. २ जानेवारी २०२४ पासुन तर कोळवाडी येथील जि. प. शाळेस दि. १८ जानेवारी २०२४ पासुन पोषण आहार देण्यास चालु केला असुन अंगणवाडी सेविकांचा संप संपल्याने व अंगणवाडी शाळा सुरू झाल्याने दि. २९ जानेवारी २४ पासुन अंगणवाडी कोटमदरा, दि. १ फेब्रुवारी २०२४ पासुन अंगणवाडी कोळवाडी व अंगणवाडी पानसरेवाडी तसेच दि. ७ फेब्रुवारी २०२४ पासुन अंगणवाडी ठाकरवाडी (कोळवाडी) येथील अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना ही पोषण आहार सुरू करण्यात आला होता.



मार्च २०२४ अखेर या शाळांना खालीलप्रमाणे एकुण ६७६३ लाडु व एकुण ६६५३ अंडी पुरविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | शेंगदाणागुळ लाडुंची संख्या | एकुण अंड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जि. प. शाळा, कोटमदरा | ४० | २८४१ | २७६१ |
| २ | जि. प. शाळा, कोळवाडी | १७ | १००३ | १००३ |
| ३ | अंगणवाडी शाळा, कोटमदरा | १५ | ७५० | ७२० |
| ४ | अंगणवाडी शाळा, कोळवाडी | २५ | १२७० | १२७० |
| ५ | अंगणवाडी शाळा, पानसरेवाडी | ५ | २५० | २५० |
| ६ | अंगणवाडी शाळा, ठाकरवाडी | १५ | ६४९ | ६४९ |
| | **एकुण** | **७२** | **६७६३** | **६६५३** |

**इ. फळबाग लागवड :-**

गाव विकास कार्यक्रमांतर्गत मौजे कोळवाडी-कोटमदरा या गावात एकुण ४२ लाभार्थ्यांना एकुण ६६७ झाडांचे (हापुस आंबा रोपे) वाटप करण्यात आले आहे.






**३) मौजे फदालेवाडी-उगलेवाडी :**

**अ. टेलिमेडिसीन दवाखानाः**

मौजे फदालेवाडी-उगलेवाडी याठिकाणी वैद्यकीय तसेच प्राथमिक आरोग्याविषयी सुविधा गावातच उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांना शिनोली, घोडेगाव याठिकाणी जावे लागते. प्राथमिक आरोग्याची सुविधा गावातच उपलब्ध व्हावी यादृष्टिकोनातुन टेलेमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर उपलब्ध असुन रूग्णांसोबत व्हिडीओ कॉलींगद्वारे चर्चा केली जाते व नर्सद्वारे रूग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले जातात.

या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रूग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलिमेडिसीन स्टाफ काही ठरावीक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रूग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **अहवाल कालावधीत दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर दवाखान्यात एकुण १६७५ रूग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलीमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन **विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा** आयोजित केल्या जातात यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना, उगलेवाडी याठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ५३ | ३१८ |

टेलेमेडिसीन दवाखान्यामार्फत अहवाल कालावधीत खालील तपशीलनुसार हिमोग्लोबीन चेकअप आयोजित करण्यात आले होते.

| अ.क्र. | दिनांक | तपासणी संख्या |
|---|---|---|
| १ | २५ मे २०२३ | १० |
| २ | २४ ऑगस्ट २०२३ | १५ |
| ३ | २४ नोव्हेंबर २०२३ | १२ |
| | एकुण | ३७ |

दि. २२ ऑगस्ट २०२३ रोजी आयुर्वेदिक निसर्गोपचार केंद्र, गोहे यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी टेलेमेडिसीन स्टाफ ने ही या आरोग्य शिबीरास मदत केली. या शिबीरात एकुण २०४ ग्रामस्थांची तपासणी केली होती.

दि. १५ डिसेंबर २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्याअंतर्गत बालदिनानिमित्त जि. प. शाळा उगलेवाडी याठिकाणी शालेय अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये संगितखुर्ची, चमचा लिंबु व ५० मी धावणे इ. ३ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी जि. प. शाळा उगलेवाडी व जि. प. शाळा फदालेवाडी या शाळेतील सर्व एकुण २६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेवून आनंद घेतला. विजयी प्रथम तीन क्रमांतील विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी टेलेमेडिसीन स्टाफ दोनही जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



## आ. माती नाला बांध दुरूस्ती :

मौजे फदालेवाडी उगलेवाडी येथील कमलजामाता मंदिर क्षेत्रातील माती नाला बांध खोलीकरण व दुरूस्ती करण्याचे नियोजित होते. त्यानुसार दि. ८ मे २०२३ रोजी नारळ फोडुन या कामास सुरूवात करण्यात आली होती.

माहे मे २०२३ मध्ये बंधाऱ्याचे खोलीकरण-रूंदीकरण, बांध बंदिस्ती, दगडी पिंचींग इ. सर्व कामे पुर्ण करण्यात आली आहे. पावसाच्या पाण्याने हा बंधारा पुर्णपणे भरलेला असुन सांडव्याद्वारे पाणी वाहत आहे. या बंधाऱ्याची एकुण पाणी साठवणुक क्षमता ३३ टीसीएम इतकी झाली असुन दुबार पिके घेण्यासाठी साधारणतः ७० शेतकऱ्यांच्या अंदाजे १५० एकर जमीनीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा होत आहे.







## इ. जमीन सपाटीकरण :

मौजे फदालेवाडी-उगलेवाडी याठिकाणी दि. १८ जानेवारी २०२४ रोजी सरपंच श्री. विनोद उगले व ग्रामस्थांच्या हस्ते जमीन सपाटीकरण या कामाचे उद्‌घाटन करून जमीन सपाटीकरणाचे काम चालु करण्यात आले होते.

माहे जानेवारी २०२४ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सर्व एकुण २० शेतकऱ्यांच्या शेत जमीनीचे सपाटीकरण पुर्ण झालेले आहे. झालेल्या कामाचे मोजमाप ही घेण्यात आले त्यानुसार एकुण २९८.८७ गुंठे जमीन लागवडीयोग्य झाली आहे. (लाभार्थी रामचंद्र उगले यांचा पुर्वीचा व आत्ताचा फोटो )





### ई. फळबाग लागवड :

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे उगलेवाडी येथील एकुण ६० लाभार्थ्यांना १०६० आंबा रोपे (केशर) वाटप करण्यात आले आहेत.





## ४) मौजे गंगापुर खुर्दः

### अ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास कार्यक्रमांतर्गत यावर्षी जमीन सपाटीकरणाच्या कामांचा समावेश केलेला आहे. मौजे गंगापुर या गावात एकुण १५ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम नियोजित होते त्यानुसार दि. १३ जुन २०२३ रोजी नारळ फोडुन जमीन सपाटीकरण या कामास सुरूवात करण्यात आली होती. माहे जुन व जुलै २०२३ या कालावधी एकुण १५ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम पुर्ण झाले आहे. झालेल्या कामाचे मोजमापही घेण्यात आले त्यानुसार एकुण २५६ गुंठे पुर्णतः नवीन क्षेत्र लागवडीयोग्य झाले आहे. (फोटो –लाभार्थी कैलास मधे यांची पुर्वीची पडीत जमीन व सपाटीकरणाचे काम झाल्यानंतरची लागवडीयोग्य जमीन)








### आ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत मौजे गंगापुर खुर्द या गावात एकुण ७० लाभार्थ्यांना एकुण ६८७ झाडांचे (केशर-३३९ हापुस-३४८ आंबा रोपे) वाटप करण्यात आले आहे. तसेच देवहंडा सार्वजनिक जागेवर एकुण १५ झाडे (हापुस) लावण्यात आली आहेत. अशा एकुण ७०२ झाडांचे वाटप गंगापुर खुर्द मध्ये करण्यात आले आहे.

## ५) मौजे चिखली :

### अ. टेलिमेडिसीन

मौजे चिखली याठिकाणी वैद्यकीय तसेच प्राथमिक आरोग्यविषयी सुविधा गावातच उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांना तळेघर, डिंभे, शिनोली, घोडेगाव याठिकाणी जावे लागते. प्राथमिक आरोग्याच्या सुविधा गावातच उपलब्ध व्हावी, यादृष्टिकोनातुन टेलेमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर उपलब्ध असुन रूग्णांसोबत व्हिडीओ कॉलींगद्वारे चर्चा केली जाते व नर्सद्वारे रूग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक औषध उपचार केले जातात.

या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रूग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलीमेडिसीन स्टाफ काही ठरावीक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रूग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **अहवाल कालावधीत दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर दवाखान्यात एकुण १२५० रूग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन **विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा** आयोजित केल्या जातात यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना, चिखली याठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ४९ | २३४ |

टेलेमेडिसीन दवाखान्यामार्फत अहवाल कालावधीत खालील तपशीलनुसार हिमोग्लोबीन चेकअप आयोजित करण्यात आले होते.

| अ.क्र. | दिनांक | तपासणी संख्या |
|---|---|---|
| १ | २५ मे २०२३ | १५ |
| २ | २४ ऑगस्ट २०२३ | १० |
| ३ | २४ नोव्हेंबर २०२३ | ०५ |
| | एकुण | ३० |

टेलेमेडिसीन नर्स स्टाफ कु. प्रिती लोहकरे हीने राजीनामा दिल्याकारणाने तिच्या जागी नविन नर्स साठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी दि. ११ एप्रिल २०२३ रोजी सौ. पुजा कोकाटे यांची श्री. विकास आम्रे यांनी ऑनलाईन मुलाखत घेऊन तिची दि. २१ एप्रिल २०२३ पासुन नियुक्ती करण्यात आली आहे. नर्स स्टाफ कु. प्रिती लोहकरे ही दि. २० एप्रिल २०२३ पर्यंत कामावर होती. दि. २८ एप्रिल २०२३ रोजी डॉ. कुमुदिनी गाढे यांनी सौ पुजा कोकाटे यांची पुन्हा ऑनलाईन मुलाखत घेतली.

मौजे चिखली येथील टेलेमेडिसीन दवाखान्यातील नर्स स्टाफ सौ. पुजा गेंगजे (कोकाटे) यांनी राजीनामा दिल्यामुळे त्या जागेकरिता अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी शितल सखाराम तळपे यांची श्री विकास आम्रे यांनी मुलाखात घेतली व दुसऱ्या दिवसापासुन कामावर रूजु  झाल्या आहेत.

दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्याअंतर्गत बालदिनानिमित्त जि. प. शाळा चिखली याठिकाणी शालेय अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये बेडुकउडी, चमचा लिंबु व ५० मी धावणे इ. ३ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी जि. प. शाळा चिखली या शाळेतील सर्व एकुण १७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेवून आनंद घेतला. विजयी प्रथम तीन क्रमांतील विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. यावेळी टेलेमेडिसीन स्टाफ, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.





## आ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास कार्यक्रमांतर्गत यावर्षी जमीन सपाटीकरणाच्या कामांचा समावेश केलेला आहे. मौजे चिखली याठिकाणी दि. २६ मे २०२३ पासुन जमीन सपाटीकरण या कामास सुरूवात करण्यात आली होती माहे मे व जुन २०२३ कालावधीत नियोजित सर्व एकुण १५ शेतकऱ्यांच्या जमीनीचे सपाटीकरण पुर्ण करण्यात आले. झालेल्या कामाचे मोजमापही घेण्यात आले होते. त्यानुसार एकुण ८४.३५ गुंठे पुर्णतः नवीन क्षेत्र लागवडीयोग्य झाले आहे. (फोटो –लाभार्थी बाळु आढारी यांची पुर्वीची पडीत जमीन व सपाटीकरणाचे काम झाल्यानंतरची लागवडीयोग्य जमीन )




## इ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत मौजे चिखली या गावात एकुण २६ लाभार्थ्यांना एकुण २५५ झाडांचे (हापुस आंबा रोपे) वाटप करण्यात आले होते.




## ६) मौजे फुलवडे :

## अ. जमीन सपाटीकरण :

मौजे फुलवडे याठिकाणी गाव विकास कार्यक्रमांतर्गत चालु वर्षामध्ये एकुण १५ शेतकरी लाभार्थ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम करण्याचे नियोजित होते त्यानुसार या गावात दि. २ मार्च २०२४ पासुन जमीन सपाटीकरणाच्या कामास सुरूवात करून अहवाल कालावधीत एकुण १५ लाभार्थी शेतकऱ्यांच्या पडीत जमीनीच्या सपाटीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीचे मोजमाप घेण्यात आले आहे. मोजमापानुसार **एकुण २२९.०५ गुंठे** जमीन लागवडीयोग्य झाली आहे. (लाभार्थी दादाभाऊ रामभाऊ हिले यांचा सपाटीकरण कामापुर्वीचा व काम झाल्यानंतरचा फोटो.)




### आ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत मौजे फुलवडे या गावात एकुण ५२ लाभार्थ्यांना एकुण ९७० झाडांचे (केशर-५०० हापुस ४७० आंबा रोपे) वाटप करण्यात आलेले आहे.






## ७) मौजे वडगाव काशिंबेग :

### अ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे वडगाव-काशिंबेग या गावात एकुण ३८ लाभार्थ्यांना एकुण ४५० झाडांचे (केशर+हापुस आंबा रोपे) वाटप करण्यात आलेले आहे.




## ८) मौजे वाळुंजवाडी :

### अ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास कार्यक्रमांतर्गत २०२३-२४ मध्ये जमीन सपाटीकरणाच्या कामांचा समावेश केलेला होता. मौजे वाळुंजवाडी या गावात एकुण १५ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम नियोजित होते त्यानुसार दि. ३ जुलै २०२३ रोजी नारळ फोडुन जमीन सपाटीकरण या कामास सुरूवात करण्यात आली होती. अहवाल कालावधीत मौजे वाळुंजवाडी या गावात एकुण १५ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले असुन झालेल्या कामाचे मोजमापही घेण्यात आले आहे. त्यानुसार **एकुण २८० गुंठे** जमीन लागवडीयोग्य करण्यात आली आहे.





### आ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे वाळुंजवाडी या गावात एकुण ६८ लाभार्थ्यांना एकुण ४९९ झाडांचे (केशर+हापुस आंबा रोपे) वाटप करण्यात आले.






## ९) मौजे निघोटवाडी–दस्तुरवाडी :

### अ. जि. प. शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यांसाठी पोषण आहारः

पोषण आहार अंतर्गत मौजे दस्तुरवाडी येथील १ जि. प. शाळा व १ अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यास दि. २ फेब्रुवारी २०२४ पासुन सुरूवात करण्यात आली होती.

मार्च २०२४ अखेर या शाळांना एकुण १८९० लाडु व एकुण १८९० अंडी पुरविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | शेंगदाणागुळ लाडुंची संख्या | एकुण अंड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जि. प. शाळा, दस्तुरवाडी | २३ | १०५४ | १०५४ |
| २ | अंगणवाडी शाळा, दस्तुरवाडी | २० | ८३६ | ८३६ |
| | एकुण | ४३ | १८९० | १८९० |

### आ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे दस्तुरवाडी या गावात अहवाल कालावधीत एकुण १० लाभार्थी शेतकऱ्यांच्या पडीत जमीनीच्या सपाटीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीचे मोजमाप घेण्यात आले आहे. मोजमापानुसार **एकुण २१८.९७ गुंठे** जमीन लागवडीयोग्य झाली आहे. (लाभार्थी वामन धोंडीबा जाधव यांचा सपाटीकरण कामापुर्वीचा व काम झाल्यानंतरचा फोटो.)





## १०) मौजे आमोंडी :

### अ. माती नाला बांध दुरूस्ती :

मौजे आमोंडी येथे दुधारा क्षेत्रातील माती नाला बांध खोलीकरण व दुरूस्ती करण्याचे नियोजित होते. त्यानुसार दि. ११ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री अरूण गुजर सो. यांच्या हस्ते नारळ फोडुन या कामाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे आकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी, गावचे विद्यमान सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. कॉन्ट्रॅक्टर श्री. रवी चौधरी यांच्या जेसीबींच्या सहाय्याने या कामास सुरूवात करण्यात आली होती.




अहवाल कालावधीत खोलीकरण, बांध बंदिस्ती तसेच बांधास दगडी पिंचींग करण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. या बंधाऱ्याची एकुण **पाणी साठवणुक क्षमता २६ टीसीएम** इतकी झाली असुन दुबार पिके घेण्यासाठी साधारणतः ८० शेतकऱ्यांच्या अंदाजे १६० एकर जमीनीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा होईल.




## आ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे आमोंडी या गावात एकुण १९३ लाभार्थ्यांना एकुण ३१७५ झाडांचे (हापुस आंबा रोपे) वाटप करण्यात आले आहे. तसेच आमोंडी येथील सार्वजनिक क्षेत्रावर ६७ (हापुस आंबा) झाडे लावण्यात आली आहेत. अशी एकुण ३२४२ झाडांचे वाटप आमोंडी या गावात करण्यात आले आहे.




## ११) मौजे पिंगळवाडी :

## अ. जि. प. शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार:



पोषण आहार अंतर्गत मौजे पिंगळवाडी येथील १ जि. प. शाळेतील एकुण २३ विद्यार्थ्यांकरिता जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार दि. २ जानेवारी २०२४ पासुन चालु केला असुन अंगणवाडी सेविकांचा संप संपल्याने व अंगणवाडी शाळा सुरू झाल्याने दि. २९ जानेवारी २०२४ पासुन अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना ही पोषण आहार सुरू करण्यात आला होता. यामध्ये दरदिवस प्रत्येक विद्यार्थ्यांस १ शेंगदाणा–गुळाचा लाडु व १ उकडलेले अंडे देण्यात येते. मार्च २०२४ अखेर या शाळांना एकुण २०५१ लाडु व एकुण १९५७ अंडी पुरविण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | शेंगदाणागुळ लाडुंची संख्या | एकुण अंड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जि. प. शाळा, पिंगळवाडी | २३ | १६३३ | १५६४ |
| २ | अंगणवाडी शाळा, पिंगळवाडी | ११ | ४१८ | ३९३ |
| | एकुण | ३४ | २०५१ | १९५७ |

## आ. फळबाग लागवड :-

गाव विकास कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवड करण्याकरिता मौजे पिंगळवाडी या गावात एकुण ८० आंबा रोपे वाटप करणे नियोजित होते. दि. १२ ऑगस्ट २०२३ रोजी एकुण ५ लाभार्थ्यांना एकुण ८० झाडांचे (केशर आंबा ) वाटप करण्यात आले आहे.






## गाव विकास कार्यक्रम इतर :

### निसर्गरंग पाक्षिक :

शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्या परिसराबाबत सामान्य ज्ञान वाढावे, तसेच वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने गाव विकास प्रकल्पांतर्गत खालील एकुण ८ जि. प. शाळांतील इ. ३ री ते इ. ७ वी च्या एकुण २४७ विद्यार्थ्यांकरिता निसर्गरंग हे पाक्षीक माहे सप्टेंबर २०२३ पासुन सुरुवात करण्यात आले होते. ह्या पाक्षीकांचे माहे मार्च २०२४ अखेर अंक देण्यात आले आहे.

शिक्षकांनी या पाक्षिकाबाबत भारत फोर्ज कंपनीचे आभार व्यक्त केले असुन मुलांना अवांतर वाचनाची आवड निर्माण होत आहे व त्यांच्या ज्ञानतही भर पडत आहे तसेच आम्हा शिक्षकांनाही यातुन सामान्य ज्ञान अवगत होत आहे, असे शिक्षकांनी सांगितले.

शाळेचे नाव व विद्यार्थी संख्या तपशील :

| अ.क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकुण |
| १ | जि. प. प्राथमिक शाळा, नंबरवाडी | ४१ | ३५ | ७६ |
| २ | जि. प. प्राथमिक शाळा, कोटमदरा | १८ | १२ | ३० |
| ३ | जि. प. प्राथमिक शाळा, वाळुंजवाडी | १३ | ०८ | २१ |
| ४ | जि. प. प्राथमिक शाळा, आमोंडी | ४१ | ४० | ८१ |
| ५ | जि. प. प्राथमिक शाळा, पिंगळवाडी | ०७ | ०४ | ११ |
| ६ | जि. प. प्राथमिक शाळा, उगलेवाडी | ०६ | ०७ | १३ |
| ७ | जि. प. प्राथमिक शाळा, फदालेवाडी | ० | ०४ | ०४ |
| ८ | जि. प. प्राथमिक शाळा, चपटेवाडी | ०८ | ०३ | ११ |
| | एकुण | १३४ | ११३ | २४७ |







दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी पाक्षिक संदर्भात मौजे आमोंडी, ठाकरवाडी व कोटमदरा येथील जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनोगत चे शुटींग श्री. निलेश चांदोरकर यांनी केले.

**सहभाग निधी रक्कम :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत वैयक्तिक फळबाग लागवड करण्याकरीता कलमी आंबा रोपे वाटप केली होती या कलमी आंबा रोपाचा प्रति नग रू. २० प्रमाणे लाभार्थी सहभाग रक्कम प्रत्येक गावानुसार जमा केलेली आहे. या सहभाग रक्कमेतुन गावात गरजेप्रमाणे कामे करण्याचे ठरले आहे. अहवाल कालावधीत काही गावांत कामे केलेली आहेत. सहभाग निधी व कामांचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र | गावाचे नाव | जमा झालेली रक्कम रू. | करण्यात आलेली काम/शेरा | खर्च रक्कम रू. | शिल्लक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाकरवाडी | २०,२२० | टेलेमेडिसीन दवाखाना फरशी बसविणे. | १९,८०० | ४२० |
| २ | गंगापुर खुर्द | १३,७४० | – | – | १३,७४० |
| ३ | फुलवडे | १९,४०० | – | – | १९,४०० |
| ४ | वडगाव काशिंबेग | ७,८०० | – | – | ७,८०० |
| ५ | वाळुंजवाडी | ९,९०० | जि. प. शाळा जाळी कंपाऊंड व गेट दुरस्ती | ९,९०० | – |
| ६ | फदालेवाडी–उगलेवाडी | २१,२०० | गावच्या ग्राम विकास निधीत जमा केले. | २१,२०० | – |
| ७ | पिंगळवाडी | १,६०० | – | – | १,६०० |
| ८ | कोळवाडी–कोटमदरा | १३,३४० | स्पिकर सेट | १३,३४० | – |
| ९ | चिखली | ५,१०० | – | – | ५,१०० |
| १० | आमोंडी | १,१७,३३५ | गावच्या ग्राम विकास निधीत जमा केले. | १,१७,३३५ | – |
| | एकुण | २,२९,६३५ | | १,८१,५७५ | ४८,०६० |





**प्रशिक्षणे :–**

गाव विकास प्रकल्प क्षेत्रातील गावांतील शेतकरी, ग्रामस्थ, महिला यांना आधुनिक शेती, विविध जोडधंदे, प्रक्रिया उद्योग, विविध अद्यावत तंत्रज्ञान, शेतीतील विविध प्रयोग याबाबत माहिती मिळावी व अद्यावत तंत्रज्ञानाचा आपल्या ही शेतात, शेती जोडधंद्यात वापर करून उत्पन्न कसे वाढवता येईल या दृष्टिकोनातुन गाव विकास प्रकल्पांतर्गत कृषि विज्ञान केंद्र–ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या सहकार्याने विविध प्रशिक्षणे आयोजित करण्याचे ठरविण्यात आले आहे त्यानुसार अहवाल कालावधीत खालील तपशील नुसार विविध प्रशिक्षणे घेण्यात आली.

| अ.क्र. | दिनांक | प्रशिक्षणाचा विषय | प्रशिक्षणाचे ठिकाण | उपस्थितांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २० एप्रिल २०२३ | शेळीपालन, भाजीपाला व फळ प्रक्रिया | ज्ञानदा प्रशिक्षण केंद्र, डिंभे | ८० |
| २ | ९ मे २०२३ | दुग्धव्यवसाय | कृषि विज्ञान केंद्र, बारामती | ३२ |
| ३ | २४ मे २०२३ | भाजीपाला व फळ प्रक्रिया | कृषि विज्ञान केंद्र, बारामती | ४० |
| ४ | ७ फेब्रुवारी २०२४ | भाजीपाला व फळ प्रक्रिया | कृषि विज्ञान केंद्र, बारामती | ३५ |
| ५ | २१ मार्च २०२४ | शेळीपालन व दुग्धव्यवसाय | कृषि विज्ञान केंद्र, बारामती | ३६ |





**ग्रामविकास प्रकल्पास भेट व लोकार्पण कार्यक्रम :**

➢ **दि. २७ एप्रिल २०२३** रोजी भारत फोर्ज लि. पुणे च्या सिएसआर प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी आंबेगाव विभागातील गाव विकास प्रकल्पास भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. अरूण गुजर सो, अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो, भारत फोर्ज कंपनी सिएसआर विभागाचे श्री. जयदिप लाड सो, उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी प्रथम आमोंडी येथील चालु असलेल्या माती बंधारा दुरूस्ती व खोलीकरणाच्या कामास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व ग्रामस्थांसोबत चर्चा केली. यावेळी गावच्या सरपंच सौ. आरती कोतवाल, उपसरपंच श्री. धनंजय फलके, ग्रामपंचायत सदस्य, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






मौजे ठाकरवाडी गावात जि. प. शाळा, नंबरवाडी या शाळेस हरित गाव या उपक्रमांतर्गत बसविण्यात आलेल्या सौर उर्जा प्रकल्पाचा लोकार्पण कार्यक्रम याच दिवशी आयोजित करण्यात आला होता. भारत फोर्ज लि. पुणे च्या सिएसआर प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्या हस्ते या सौर उर्जा प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी श्री. अरूण गुजर सो।, श्री. सागर मिटकरी सो।, श्री. जयदिप लाड सो।, तसेच उद्योजक श्री. सचिन भोर, गावचे सरपंच श्री. बबन बारवे, उपसरपंच श्री. जालींधर काळे, जि. प. शाळेचे शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी उपस्थित सर्वांना गाव विकास प्रकल्पांतर्गत चालु कामे व नियोजित कामांबाबत मार्गदर्शन केले.

➢ **दि. २४ ऑगस्ट २०२३** रोजी भारत फोर्ज लि. पुणे सि.एस.आर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी मौजे ठाकरवाडी या गावास भेट देऊन झालेल्या व चालु असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे उपसचिव श्री. अरूण गुजर सो. अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. भारत फोर्ज लि पुणे सिएसआर विभागाचे श्री. जयदिप लाड, युवा उद्योजक श्री. सचिन भोर, जि.प. सदस्या सौ. तुलसीताई भोर इ. मान्यवर उपस्थित होते.



भेटी दरम्यान प्रथमतः नंबरवाडी येथील वन क्षेत्रावरील वृक्षरोपण संबंधी चालु असलेल्या खड्डे खोदकाम कामांची पाहणी केली. त्यानंतर वडाचीवाडी येथील खोलीकरण दुरूस्तीचे काम पुर्ण झालेल्या पाझर तलावाचे जलपुजन व लोकार्पण कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी वरील मान्यवरांसमवेत गावचे सरपंच श्री बबन बारवे, उपसरपंच जालींधर काळे, माजी जि. प. सदस्य श्री. खंडु पारधी, ग्रामस्थ, महिला व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

मा. डॉ लिना देशपांडे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले व पाझर तलाव दुरूस्ती कामाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच फळबाग लागवड करण्याऱ्या प्रातिनिधीक शेतकऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फळबाग झाडांचे (हापुस व केशर आंबा) वाटप करण्यात आला.






या कार्यक्रम प्रसंगी बोलतांना मा. श्रीमती लिना देशपांडे मॅडम यांनी सांगितले की, गाव विकास प्रकल्प सुरू करतांना प्रथमतः ठाकरवाडी हे गाव घेण्यात आले होते व रस्ता दुतर्फा वृक्षलागवड ते सौर उर्जा प्रकल्पापर्यंत सर्वात जास्त कामे ही मौजे ठाकरवाडी या गावात करण्यात आली आहेत. ठाकरवाडी हे गाव हरित गाव करण्याचा मानस असुन ग्रामस्थांनी चालु असलेल्या कामात अधिकाअधिक सहभाग घ्यावा, तसेच फळबाग लाभार्थ्यांनी सर्व झाडांची योग्य जोपासना करावी, असे सांगितले.

त्यानंतर जांभळेमळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या दोन वर्गखोल्या नूतनीकरण कामाचा लोकार्पण कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी वरील सर्व मान्यवरांसोबत आदर्श निवृत्त शिक्षक श्री. इनामदार सर व सामाजिक कार्यकर्ते श्री. बाळासाहेब चासकर हे ही मान्यवर शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व महिला, उपस्थित होत्या.

प्रथमतः सर्व मान्यवरांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन मोठ्या उत्साहात मुख्याध्यापक श्री राजेंद्र चासकर, शिक्षिका सौ. पौर्णिमा जाधव, ग्रामस्थ व महिलांनी स्वागत केले. शाळा नुतनीकरणाच्या कामाच्या कोनशिलेचे अनावरण श्री. लिना देशपांडे मॅडम यांच्या शुभहस्ते करण्यात आले तर श्री. अरूण गुजर सो यांच्या शुभहस्ते पुजन करून नारळ फोडण्यात आला. मान्यवरांच्या शुभहस्ते दोनही वर्गखोल्यांचे रिबन कापून उद्घाटन करण्यात आले.





या कार्यक्रमाची प्रस्तावना महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे यांनी केली. त्यामध्ये त्यांनी ठाकरवाडी गावात झालेल्या व चालु असलेल्या सर्व कामांची माहिती दिली. जि. प. शाळा जांभळेमळा या शाळेची माहिती देऊन हे काम करणे गरजेचे होते, हे सांगितले.

युवा उद्योजक श्री. सचिन भोर यांनी ठाकरवाडी गावासाठी शासकिय निधी कमी पडल्यास किंवा उपलब्ध नसल्यास त्या कामांबाबत भारत फोर्ज कंपनीच्या डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्या सोबत चर्चा केली की, ती कामे त्यांच्या सि.एस.आर निधीतुन पुर्ण करण्याचा ते प्रयत्न करतात. आजपर्यंत ठाकरवाडी गावासाठी त्यांनी खूप कामे केली आहेत व भविष्यातही करतीलच. जि. प. शाळा जांभळेमळा या शाळेस सौर उर्जा प्रकल्प बसवावा, अशी त्यांनी विनंती डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्याकडे केली.




जि.प. शाळा जांभळेमळ्यातील विद्यार्थीनी कु. सई खंडु पारधी, पालक सौ. आशा खंडु पारधी व शिक्षिका सौ. पौर्णिमा जाधव यांनी या पुर्ण झालेल्या शाळेच्या इमारतीच्या कामाबाबत आपली मनोगते व्यक्त केली.

त्यानंतर श्री. इनामदार सर यांनी जांभळेमळा या शाळेचे काम केल्याबद्दल भारत फोर्ज लि. पुणे यांचे कौतुक केले. सर्वच दृष्टीने गावात ज्याठिकाणी सार्वजनिक कामांची गरज असेल तेथे काम पुर्ण करण्याचा मानसच डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी घेतला असुन या शाळेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. त्यांनी अनेक कामे गावात केली असुन सर्व कामे उत्कृष्ठ असल्याचे सांगितले. भारत फोर्ज कं. चे मा. श्री. बाबासाहेब कल्याणी व डॉ. लिना देशपांडे मॅडम या परिसाच्या रूपाने गावाला मिळालेली देणगी आहे व या व्यक्ती ज्या कामाला हात लावतील ती कामे पुर्ण होतातच किंवा ती पुर्ण करून घेतातच असे उद्गार त्यांनी काढले.

डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना भारत फोर्ज कं बाबत माहिती दिली. सी.एस.आर निधीतुन १०० गावांमध्ये गाव विकासाची कामे करत असल्याचे सांगितले. जांभळेमळ्यातील शाळेची गरज लक्षात घेऊन तत्काळ मंजुरी देण्यात आली व काम कमी कालावधीत पुर्ण करण्यात आले. गावात विविध विकास कामे सुरूच राहतील असे ही सांगितले व ठाकरवाडी हे गाव हरित गाव करत असतांना विविध कामांमध्ये सर्व ग्रामस्थांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे अवाहन केले.



कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मुख्याध्यापक श्री. राजेंद्र चासकर तर उपस्थित सर्वांचे आभार शिक्षक सुनिल भेके सर यांनी केले.

➢ **दि. २७ डिसेंबर २०२३** रोजी भारत फोर्ज लि. पुणे च्या सिएसआर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी आंबेगाव तालुक्यातील गाव विकास कार्यक्रमांतर्गत पुर्ण झालेल्या कामांना भेटी देऊन पाहणी केली. त्यांच्या समवेत महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे उपसचिव श्री. अरूण गुजर सर, अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी, भारत फोर्ज कं. सि. एस. आर विभागाचे श्री. जयदिप लाड इ. मान्यवर उपस्थित होते.

प्रथम मौजे उगलेवाडी या गावास भेट देण्यात आली. येथील कमलजामाता देवी पाझर तलावाचे खोलीकरण, रूंदीकरण व बांधबंदिस्तीचे काम चालु वर्षात पुर्ण करण्यात आले आहे. या पाझर तलावाचे जलपुजन करून लोकार्पण मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले व कमलजामाता देवीची आरती घेण्यात आली. त्यानंतर श्रीफळ व पुष्प देऊन सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. श्री. शंकर शिंगाडे यांनी गाव विकास कार्यक्रमांतर्गत गावात झालेल्या सर्व उपक्रमांची माहिती दिली. तसेच श्री. रामचंद्र उगले यांनी या पाझर तलावाचे काम उत्कृष्ट दर्जाचे झाले असुन आजही पाझर तलाव पुर्णपणे भरलेला आहे याबाबत भारत फोर्ज कंपनीचे कौतुक करून आभार व्यक्त केले. माजी सरपंच सौ. शांता उगले यांनी टेलेमेडिसीन दवाखाना येथील महिलांना अधिक उपयुक्त असल्याचे सांगितले.

डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी उपस्थित सर्व ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, तलावाचे काम उत्कृष्ट झाले असुन मंदिर परिसरही खुप छान आहे. या परिसर अधिक सुशोभित कसा करता येईल याबाबत ग्रामस्थांना सहभाग घ्यावा, मंदिर परिसर व तलावाच्या आजुबाजुच्या परिसरात वृक्षारोपण करावे. तसेच या मंदिरापर्यंत येणारा रस्त्याचे काम करण्याबाबत भारत फोर्ज मार्फत विचार करता येईल.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. सुरेश काळे यांनी सुत्रसंचालन श्री. किसन भोजने यांनी तर सर्वात शेवटी उपस्थित सर्वांचे आभार श्री. बजरंग उगले यांनी मानले. यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य महिला व ग्रामस्थ तसेच महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.





यानंतर मौजे आमोंडी या गावास भेट देण्यात आली. येथील दुधारा पाझर तलावाचे खोलीकरण, रूंदीकरण व बांधबंदिस्तीचे काम चालु वर्षात पुर्ण करण्यात आले आहे. या पाझर तलावाचे जलपुजन करून लोकार्पण मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर श्रीफळ व पुष्प देऊन सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. प्रस्तावनेमध्ये श्री. सुरेश काळे यांनी गावात गेले ३/४ वर्षे काम चालु असुन या दोन वर्षात एकुण ६ हजार कलमी आंबा झाडांचे वाटप शेतकरी लाभार्थ्यांना केले असल्याचे सांगितले.

डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी उपस्थित सर्व ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, आमोंडी हे गाव ग्रीन व्हिलेज या संकल्पनेकरीता घेतलेले असुन भौतीक कामाबरोबर गावातील स्वच्छता होणे गरजेचे आहे. तसेच इतर गावाप्रमाणे आठवड्यातील १ तास गावासाठी श्रमदान करून गावची स्वच्छता करावी त्यानंतर गावात पुढील कामे केली जातील.

शेवटी ग्रामसेविका सौ. योगिता दळे मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले तसेच पाझर तलावाचे काम उत्कृष्ट दर्जाचे करून दिल्याबाबत भारत फोर्ज कंपनीचे कौतुक करून खुप खुप धन्यवाद दिले. तर सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य श्री. राम फलके यांनी केले.






यानंतर मौजे ठाकरवाडी गावास भेट देण्यात आली व येथील वन जमीनीवरील लागवड करण्यात आलेल्या वृक्षारोपणाची त्याचबरोबर वृक्षारोपणास तयार केलेल्या संरक्षण कंपाऊंडचे, ठिबक सिंचन, पाण्याच्या टाक्या इ. ची पाहणी केली व झाडांमधील गवत काढण्याबाबत सुचना केल्या.

**स्वच्छता ही सेवा :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनामार्फत सर्व गावांमध्ये दि. १ ऑक्टोबर २०२३ रोजी श्रमदानाने गावातील सार्वजनिक जागेत स्वच्छता करण्याचे अवाहन केले होते. त्यानुसार गाव विकास प्रकल्पातील मौजे ठाकरवाडी, आमोंडी, उगलेवाडी व पिंगळवाडी या गावांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी मौजे ठाकरवाडी या गावात ग्रामपंचायत, गावठाण व शाळा परिसरात स्वच्छता करण्यात आली. मौजे आमोंडी या गावात गावातील अंतर्गत रस्ते व मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. मौजे उगलेवाडी या गावात ग्रामपंचायत परिसर, शाळा व मंदिर परिसर तसेच गावातील अंतर्गत रस्ते यांची स्वच्छता करण्यात आली. मौजे पिंगळवाडी या गावात गावातील अंतर्गत रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली तर रस्तालगतचे गवत काढण्यात आले. यावेळी गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.








**स्वातंत्र्य अमृत महोत्सव वर्षाचा सांगता सामरोप :**

दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी भारत देशाचा ७७ स्वातंत्र्यदिन व अमृत महोत्सव वर्षाचा सांगता सामरोप संपुर्ण देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला गेला. या विशेष दिनाचे औचित्य साधुन गाव विकास कार्यक्रमांतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम सर्व गावांमध्ये राबविण्यात आला. वृक्षारोपण कार्यक्रमांर्गत मौजे उगलेवाडी याठिकाणी लाभार्थ्यांना केशर आंबा या झाडांचे वाटप करण्यात आले तसेच जि. प. शाळा उगलेवाडी व जि. प. शाळा नंबरवाडी, ठाकरवाडी या शाळेस आंबा झाडे देण्यात आली व शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले आहे.





**सहविचार बैठक :**

मौजे अमोंडी या गावात गाव विकास प्रकल्प राबविण्याकरिता समन्वय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीची मिटींग दि. १९ ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रामपंचायत आमोंडी याठिकाणी घेण्यात आली. या मिटींगमध्ये काही जुने सदस्य कमी करून नविन सदस्य घेण्यात आले. तसेच फळबाग लागवड उपक्रमांतर्गत जमा झालेल्या सहभाग रक्कमेविषयी चर्चा करण्यात आली. प्रथम बँकेत संयुक्त खाते उघडुन सर्व रक्कम या खात्यात जमा करण्याचे ठरले. सार्वजनिक जागेत लागवड करण्यात आलेल्या झाडांना पाण्याकरिता या रक्कमेतुन पाईपलाईन करण्याचे ठरले. पाईपलाईनचे काम पुर्ण होईपर्यंत टँकरने पाणी देण्याचे ठरले तसेच या समितीची मिटींग दोन महिन्यातुन एकदा घेण्याचे ठरले.या मिटींगकरिता पदसिद्ध अध्यक्ष गावचे सरपंच तसेच उपसरपंच, समिती सदस्य, ग्रामस्थ व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजी आमोंडी गावच्या ग्रामसभेस श्री. माणिक सावंत हे हजर होते. ग्रामसभेत झाडांना पाणी देणे, पाईपलाईन करणे, रोजगार हमी योजनेतून मजुरांची नियुक्ती करणे व ग्रामविकास निधी खात्याचा तपशील विषयी चर्चा करण्यात आली. दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रामविकास निधी खात्यात मागील वर्षाची सहभाग रक्कम रू. ५४,१७५ इतकी भरण्यात आली आहे. चालु वर्षातील सहभाग रक्कम पुर्णपणे जमा असुन बँक खात्यात भरणे बाकी आहे.

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षात शेतकरी लाभार्थ्यांना वाटप केलेल्या फळबाग झाडांच्या नगाप्रमाणे सहभाग रक्कम लाभार्थ्यांकडुन जमा करण्यात आलेली होती. गावात गाव विकास समिती स्थापन केलेली असुन ही सहभाग रक्कम बॅकेत जमा करण्यासाठी घोडेगाव याठिकाणी समितीच्या नावाने बँक खाते ही उघडण्यात आले व सर्व रक्कम बँक खात्यात भरणा केलेली आहे. याकरिता समितीची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत या रक्कमेच्या खर्चाबाबत ही चर्चा करण्यात आली होती. या सहभागातुन सार्वजनिक क्षेत्रावर पुर्वी गाव विकास प्रकल्पांतर्गत लागवड करण्यात आलेल्या झाडांची जोपासना व पाण्याची सोय याकरिता प्रथम खर्च करण्यात यावा असे ठरले होते.

त्यानुसार अहवाल कालावधीत पाण्याची टाकी, मोटार, पाईप, केबल, इ. खरेदी करण्यात आली व त्याची जोडणी करण्यात आलेली आहे. या करिता रू.३८,२५२/- इतका खर्च सहभाग रक्कमेतुन करण्यात आलेला आहे.

**कृषि विज्ञान केंद्र बारामती अधिकाऱ्यांची फळबागांना भेट :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४ या वर्षात एकुण १० गावांतील एकुण ४८३ लाभार्थ्यांना एकुण ८८७९ कलमी आंबा झाडांचे वाटप करण्यात आले होते. सर्व लाभार्थ्यांनी या झाडांची लागवड केलेली आहे. या लागवड केलेल्या झाडांचे सर्वेक्षण करणे व जिओ टॅगिंगचे फोटो घेण्याकरिता कृषि विज्ञान केंद्र बारामतीचे अधिकारी श्री. प्रफुल्ल पोटे यांनी गाव विकास प्रकल्पास भेट दिली.

त्यांनी दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी मौजे फदालेवाडी–उगलेवाडी, कोळवाडी–कोटमदरा, पिंगळवाडी, ठाकरवाडी (चास), वडगाव–काशिंबेग व वाळुंजवाडी या गावांत तर दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी मौजे चिखली, आमोंडी, गंगापुर खुर्द व फुलवडे गावांतील काही लाभार्थ्यांना प्रातिनिधीक भेट देऊन त्यांच्या फळबागांची पाहणी केली व फळबागांचे लाभार्थ्यांसमवेत जिओ टॅगिंगचे फोटो घेतले.





**आढावा बैठकः–**

दि. १६ जानेवारी २०२४ रोजी भारत फोर्ज कं. पुणे येथे सिएसआर निधी अंतर्गत काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांची भारत फोर्ज कं. चे श्री. बाबासाहेब कल्याणी, मुख्य व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली एकत्रित मिटींग व पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यामध्ये प्रथम ग्रामीण विकास योजनेअंतर्गत प्रत्यक्ष सहभाग न घेणाऱ्या संस्था व व्यक्तींची सन २०२३–२४ मध्ये केलेल्या कामासंदर्भात आढावा घेण्यात आला व त्यानंतर ग्रामीण विकास योजनेत प्रत्यक्ष भाग घेणारे व्यक्ती व संस्था यांचा आढावा घेऊन मा. बाबासाहेब कल्याणी सो. मा. अमित कल्याणी सो. यांच्यासोबत पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी मा. बाबासाहेब कल्याणी सो. मा. अमित कल्याणी सो. व सिएसआर विभाग प्रमुख मा. डॉ लिना देशपांडे यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांसंबंधी सविस्तर





माहिती दिली. सदर मिटींगसाठी व पत्रकार परिषदेसाठी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सहसचिव, मा. अरूण गुजर सो, आकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी व प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे हजर होते.

**शेतकरी अभ्यास सहल : कृषिक प्रदर्शन कृषि विज्ञान केंद्र, बारामती :–**

दरवर्षी कृषि विज्ञान केंद्र, बारामती याठिकाणी कृषक कृषि प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादन कसे वाढवावे याची प्रात्यक्षिके तसेच विविध शेतीविषयक आधुनिक यंत्रसामुग्री पहावयास मिळते. प्रकल्प कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना हे प्रदर्शन पहावयास मिळावे व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी याकरिता गाव विकास प्रकल्पांतर्गत दि. १९ जानेवारी २०२४ रोजी शेतकरी अभ्यास सहल कृषक कृषि प्रदर्शन बारामती याठिकाणी नेण्यात आली होती. गाव विकास प्रकल्पातील १२ गावांतील २८ शेतकरी व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे ४ कर्मचारी असे एकुण ३२ व्यक्ती या अभ्यास सहलीत सहभागी झाले होते.



या सर्वांनी कृषक कृषि प्रदर्शनास भेट देऊन विविध पिकांचे शेती डेमो प्लॉट तसेच विविध कंपन्यांनी तयार केलेले विविध शेती डेमो प्लॉट पाहिले. नवनवीन बि-बीयाणे, आधुनिक यंत्रसामुग्री, अवजारे, खते, तण-किडनाशके इ. चे स्टॉल, माती विरहीत शेतीचे ही प्रात्याक्षिक प्लॉट, भरड धान्याचे स्टॉल व प्लॉट पाहण्यात आले. विविध जातीचे शेळी, गाय, म्हैस व त्यांना देत असलेले विविध आहार व खाद्य इ. पाहण्यासाठी ठेवण्यात आले होते त्याबाबतही माहिती घेण्यात आली.



## ५. मुंबई स्थित देणगीदार – जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना मदत :

मुंबईस्थित देणगीदार मा. श्री. सतीश, श्री. हरी व श्री. बाला यांनी सन २०२१ व २०२२ मध्ये काही शाळांना भेटी देऊन काही साहित्य तसेच काही दुरूस्तीची कामे मंजुर केली होती. त्यापैकी अहवाल कालावधीत खालील काही शाळांना साहित्य देण्यात आले आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | जि. प. शाळा, वाळुंजवाडी | सि-सॉ -१ | ८,००० |
| | | झोका -१ | १३,५०० |
| | | घसरगुंडी दुरूस्ती | ८,००० |
| २ | जि. प. शाळा, शिनोली | कार्यालय कपाट-१ | ११,००० |
| | | मुलांना बसण्यासाठी स्टुल-१५ | ७,५०० |
| | **एकुण रक्कम रू.** | | **४८,०००** |





## ६. इतर :

➢ रोटरी क्लब, पुणे यांनी पिण्याच्या पाण्याची तळी दुरूस्तीच्या कामांसंबंधी अंदाजपत्रकांची मागणी केली होती. त्यांच्या मागणीनुसार माहे एप्रिल २०२३ मध्ये प्रकल्प क्षेत्रातील पुर्वी संस्थेने खोदलेल्या काही तळयांच्या (सायरखळा, मेमाणेवाडी, हातवीज, सुपेवाडी, नामदेववाडी, कोंढरे, फणसवाडी, हिलेवाडी) दुरूस्तीचे अंदाजपत्रके (रू. ३५,१८,२००/-) बनविण्यात आली व रोटरी क्लब, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहेत.

शाश्वत संस्थेने आहुपे याठिकाणी तयार केलेल्या इको टुरिझम या उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम दि. ३ जुन २०२३ रोजी ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमास संस्थेमार्फत श्री. किशोर भोर व अनंता पारधी हे उपस्थित होते.

➢ श्री. उदयसिंह चौधरी हे माहे जुन २०२३ अखेर सेवामुक्त झाले. दि. ३० जुन २०२३ रोजी कार्यालयामार्फत त्यांचा छोटासा सेवापुर्ती सत्कार करण्यात आला.

➢ श्री. उदयसिंह चौधरी यांच्या सह्या असणाऱ्या एकुण ४० बँक खात्यांपैकी ३१ खात्यांचे सहीचे अधिकार बदलण्याचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत ९ पैकी १ बँक खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा डिंभे (पिडीसीसी)

याठिकाणी श्री. उदयसिंह चौधरी व श्री. बाळासाहेब बेंढारी यांच्या सहीचे अधिकार असलेले आहे परंतु जुन २०२३ अखेर या खात्यावरील रक्कम रिजर्व बँकेकडुन पुन्हा पिडीसीसी बँकेस अद्याप मिळालेली नाही तर कोटेश्वर वनउपज संघाचे नवीन पासबुक तयार करून ऑफिसकडे जमा केले आहे. उर्वरीत ७ खात्यांपैकी काही खात्यांवरील रक्कम फारच कमी असल्याने व काही सहीचे अधिकार असलेल्या व्यक्ती चाकण, पुणे येथे कामानिमित्त बाहेरगावी राहत असल्याने त्यांचा म्हणावा असा प्रतिसाद मिळत नाही.

➢ कार्यालयात दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्यदिना निमित्त श्री. सुरेश मिटकरी सो. यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच डॉ. दादा गुजर यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

➢ पुर्वी राबविण्यात आलेल्या नाबार्ड प्रकल्पातील बँक खात्यावरील संस्थेच्या प्रतिनिधींच्या सह्यांचे अधिकार बदलण्यासंदर्भात संबंधित ग्रामसथांना वेळोवेळी सुचना केल्या होत्या. परंतु अद्याप सह्यांचे अधिकार बदलेले नसुन सदर बँक खाती बँक ऑफ महाराष्ट्र डेहणे शाखा याठिकाणी आहेत. माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये या बँकेतुन सदर खात्यांची केवायसी पुर्ण करण्यासंदर्भात ग्रामस्थांनामार्फत विनंती अर्ज मिळाला. त्याप्रमाणे बँक खात्यांची केवायसी पुर्ण करण्यात आली असुन ग्रामस्थांना सह्यांचे अधिकार बदलण्यासंदर्भात पुन्हा सुचना केल्या आहेत.

➢ दि. २० जानेवारी २०२४ रोजी पुणे येथील फिनास्त्रा या आय टी कंपनीतील अधिकाऱ्यांनी भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्पास भेट देऊन प्रकल्प कार्यक्रमांविषयीची चित्रफित पाहिली व महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत अधिक माहिती घेतली. तसेच गाव विकास कार्यक्रमांतर्गत मौजे ठाकरवाडी येथे पुर्ण झालेल्या व चालु असलेल्या विविध प्रकल्प भेट देऊन उपक्रमांची माहिती घेतली. यामध्ये शैक्षणिक उपक्रम, वृक्षारोपण, शेळी गोठा, पाणी पुरवठा सुविधा, फळबाग लागवड, जमीन सपाटीकरण, टेलीमेडिसीन उपक्रम इ.





➢ फिनास्त्रा या आयटी कंपनीच्या सिएसआर निधीअंतर्गत गाव विकास योजना राबविण्याकरिता दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी मौजे पोखरकरवाडी (पिंपळगाव-घोडे) या गावातील ग्रामस्थांसोबत आवश्यक विविध विकास कामांबाबत चर्चा करण्यात आली. सदर माहितीच्या आधारे अहवाल कालावधीत या गावाची प्रोफाईल तयार करण्यात आली व रू. ५०,६२,०००/- इतक्या रक्कमेच्या कामांचे अंदाजपत्रक तयार करून पुणे ऑफिसला पाठविण्यात आले आहे. यामध्ये जमीन सपाटीकरण, शेळी गोठा, पाझर तलाव दुरूस्ती, सेंद्रिय शेती, आरोग्य शिबीर, शाळा सुधार योजना, बचत गट आणि सौरउर्जा यांसारख्या उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

## ➢ सोफेकॉम संस्था कार्यशाळा :

सोफेकॉम संस्था, पुणे यांच्यामार्फत दि. ६ व ७ फेब्रुवारी २०२४ रोजी पाणी-अन्न-जैवविविधता यातील परस्पर संबंधाच्या संदर्भातील उर्ध्व भीमा उपखोऱ्याचे परिस्थितीक विश्लेषण या विषयावर कार्यशाळा इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स अॅन्ड एज्युकेशन, पुणे याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे प्रतिनिधी म्हणुन श्री. किशोर भोर हे उपस्थित होते. या कार्यशाळेत प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पाच्या विश्लेषणाच्या अभ्यासाकरिता ३ विभाग केले होत. त्यात त्यांनी काही गावांची निवड केली. वरील विभागात तेरूंगण, राजपुर, कोंढरे, नानवडे तर मधील विभागात चपटेवाडी, महाळुंगे पडवळ, धामणी व खालील विभागात चांदे बु, थेरगाव, बेनवडी, कोळवाडी इ. गावांचा समावेश केला होता. घरोघरी जाऊन एकुण ३१३ कुटुंबांचा सर्व्हे केला. पिक पद्धती, नविन तंत्रज्ञानाचा वापर, मुख्य उत्पन्न स्त्रोत, मिळणारे उत्पन्न, पाण्याचे स्त्रोत, शेतीस, लोकांस होणारा प्राण्यांचा त्रास इ. गोष्टींचा विचार केला गेला तसेच हवामान खात्याच्या अंदाजांचा समावेश यात करण्याचा प्रयत्न केला. शेती करतांना शेतकऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांचाही विचार केला गेला. अन्न, पाणी आणि जैवविविधता याबाबत गट कार्य करण्यास दिले. दुसऱ्या दिवशी नागरिकांच्या सहभागातुन सिस्टिम सायन्स मध्ये विश्वास वाढविण्यासाठी आणि समजुन घेण्यासाठीची साधने यामध्ये कोणकोणत्या तंत्राचा वापर सर्व्हेक्षणासाठी करण्यात आला याची माहिती दिली व सर्व गोष्टींवर सविस्तर खुली चर्चा करण्यात आली.

➢ **प्रयास संस्था मिटींग :**

दि. ६ फेब्रुवारी २०२४ रोजी डिंभे येथील कार्यालयात प्रयास संस्थेचे प्रतिनिधी व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कार्यकर्ते यांच्यामध्ये भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्पाचे काम समाजावुन घेण्यासंदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी प्रयास संस्थेच्या प्रतिनिधी डॉ. रितु परचुरे, सिनिअर रिसर्च फेलो व श्रीमती वैशाली डोंगरे, सहाय्यक समन्वयक ह्या उपस्थित होत्या. त्यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत चालु असलेल्या गाव विकास उपक्रमांची माहिती घेतली. तसेच गावांतील पिण्याचे पाणी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे गावांमधील काम, गावातील साथीचे रोग, आरोग्या विषयी गावात पुरविण्यात येणारी साधने, टेलेमेडिसीन हा नाविन्यपुर्ण उपक्रम तसेच तो कसा चालविला जातो याबाबत माहिती घेतली व महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत आरोग्य संदर्भात कोणकोणती कामे केली जातात याषियी माहिती घेतली व चर्चेअंती प्रयास संस्था व महाराष्ट्र आरोग्य मंडळ या दोनही संस्थांच्या एकमताने कोणकोणती कामे करता येतील याबाबत महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सहसचिव श्री. अरूण गुजर सो यांच्यासोबत चर्चा करून ठरविण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

दि. २ मार्च २०२३ रोजी कार्यालयात **डॉ. दादा गुजर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली** व डॉ. दादा गुजर स्मृती पुरस्कार वितरण कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते डॉ. दादा गुजर इंग्लिश मिडीअम स्कुल महंमदवाडी, हडपसर, पुणे याठिकाणी उपस्थित होते. या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार मा. श्री.हरिश्चंद्र सुडे,संस्थापक अध्यक्ष,ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान,बुधोडा,जि.लातूर व आरोग्य क्षेत्रातील पुरस्कार मा.डॅ.हेमकांत बावीसकर, संस्थापक ,नेत्रायु हॉस्पिटल, जळगाव यांना प्रदान करण्यात आला आहे.

कार्यालय परिसरातील स्वच्छता, गवत काढणे, खुरपणी करणे झाडांना पाणी देणे इ. कामे वेळोवेळी चालु आहेत.

## मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडी

**१. शैक्षणिक :**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात खालील तपशीलनुसार एकुण ६६ मुली वसतीगृहात राहुन शिक्षण घेत आहेत. उन्हाळी सुट्टी नंतर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चालु झाल्याने दि. १५ जुन २०२३ पासुन वसतीगृह पुन्हा चालु झाले.

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | ११ वी | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुलींची संख्या | ११ | ०८ | १९ | ०८ | ११ | ०८ | ०१ | **६६** |

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात मुलींच्या विद्यालयामार्फत वेळोवेळी विविध परिक्षा घेण्यात आल्या या परिक्षांची वेळापत्रके पुढीलप्रमाणे :

| अ.क्र | परिक्षेचा कालावधी दि. | इयत्ता | परिक्षेचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | १ एप्रिल २०२३ ते ११ एप्रिल २०२३ | ५ वी ते ८ वी | सत्र परिक्षा-२ (सन २०२२-२३) |
| २ | १ एप्रिल २०२३ ते १७ एप्रिल २०२३ | ९ वी | सत्र परिक्षा-२ (सन २०२२-२३) |
| ३ | ७ जुलै २०२३ ते ८ जुलै २०२३ | ५ वी ते १० वी | सेतु पुर्व चाचणी (सन २०२३-२४) |
| ४ | १ ऑगस्ट २०२३ ते २ ऑगस्ट २०२३ | ५ वी ते १० वी | सेतु उत्तर चाचणी (सन २०२३-२४) |
| ५ | १२ सप्टेंबर२०२३ ते १३ सप्टेंबर २०२३ | ५ वी ते १० वी | चाचणी परिक्षा (सन २०२३-२४) |
| ६ | २७ऑक्टो.२०२३ ते ६ नोव्हें.२०२३ | ५ वी ते १० वी | सत्र परिक्षा-१ (सन २०२३-२४) |
| ७ | ८ जाने. २०२४ ते १२ जान. २०२४ | १० वी | सराव परिक्षा (सन २०२३-२४) |
| ८ | १८ जाने २०२४ ते २३ जाने २०२४ | ५ वी ते ९ वी | चाचणी परिक्षा (सन २०२३-२४) |
| ९ | २३ जाने २०२४ ते २७ जाने २०२४ | १० वी | सराव परिक्षा (सन २०२३-२४) |
| १० | १ मार्च २०२४ ते २६ मार्च २०२४ | १० वी | एस एस सी बोर्ड परिक्षा |
| ११ | २८ मार्च २०२४ ते १२ एप्रिल २०२४ | ५ वी ते ९ वी | सत्र परिक्षा-२ (सन २०२३-२४) |

**वार्षीक निकाल : (इ. ५ वी ते इ. ९ वी)**

माहे एप्रिल २०२३ मध्ये इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांची वार्षिक परिक्षा मुक्तादेवी विद्यालय नारोडी मार्फत घेण्यात आली होती. दि. ६ मे २०२३ रोजी श्री. मुक्तादेवी विद्यालय, नारोडीचा इयत्ता ५ वी ते ९ वी चा वार्षिक निकाल (सन २०२२–२३) जाहीर करण्यात आला. आपल्या वसतीगृहातील इ. ५ वी ते ९ वी पर्यंत एकुण ४८ मुली शिकत होत्या. इयत्तेनुसार निकाल तपशील पुढीप्रमाणे :

| अ.क्र. | इयत्ता | एकुण मुलींची संख्या | उत्तीर्ण मुलींची संख्या | अनुत्तीर्ण मुलींची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ५ वी | ०७ | ०७ | ०० |
| २ | ६ वी | १४ | १४ | ०० |
| ३ | ७ वी | ०५ | ०५ | ०० |
| ४ | ८ वी | १२ | १२ | ०० |
| ५ | ९ वी | १० | ०९ | ०१ |
| एकुण | | ४८ | ४७ | ०१ |

**इयत्ता १० वी निकाल :**

दि. २ जुन २०२३ रोजी इ. १० वीच्या मुलींचा वार्षिक निकाल जाहीर झाला. वसतीगृहातील एकुण १५ मुली इ. १० वी मध्ये शिकत होत्या. सर्व मुली चांगल्या मार्काने उत्तीर्ण झाल्या आहेत. **सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे :**

| अ. क्र. | नाव | मराठी | हिंदी | इंग्रजी | गणित | विज्ञान | समाज शास्त्र | एकुण गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उज्वला मालु बरकडे | ९२ | ८१ | ७५ | ८९ | ९४ | ८७ | ४४३ | ८८.६० |
| २ | मंगल विलास किर्वे | ९० | ९४ | ७१ | ८३ | ६६ | ९५ | ४३३+३ | ८७.२० |
| ३ | गौरी तानाजी जोशी | ९० | ९० | ९५ | ८० | ५९ | ८० | ४३५ | ८७.०० |
| ४ | निलम विलास फोडसे | ९२ | ९३ | ८४ | ६३ | ६८ | ८३ | ४२० | ८४.०० |
| ५ | साक्षी नामदेव माळी | ९३ | ८४ | ८२ | ७४ | ५१ | ८० | ४१३ | ८२.६० |
| ६ | ज्योती बाळु तरपाडे | ८२ | ८३ | ६९ | ७४ | ५७ | ७८ | ३८६ | ७७.२० |
| ७ | प्रणाली संजय गाडेकर | ८१ | ७२ | ५९ | ६० | ६३ | ७४ | ३५० | ७०.०० |
| ८ | पुजा वसंत जाधव | ६२ | ७८ | ६२ | ७९ | ५७ | ६१ | ३४२+३ | ६९.०० |
| ९ | इशा धोंडु भालींगे | ७९ | ७१ | ५७ | ५२ | ६८ | ५९ | ३३४ | ६६.८० |
| १० | श्रावणी मारूती भोजने | ६३ | ७१ | ६३ | ५३ | ४६ | ६८ | ३१८ | ६३.६० |
| ११ | इशा रामदास घोडे | ७५ | ६४ | ५८ | ४६ | ३५ | ७३ | ३१६ | ६३.२० |
| १२ | गिता रघुनाथ करवंदे | ६५ | ६३ | ६१ | ३९ | ६० | ६० | ३०९ | ६१.८० |
| १३ | सिद्धी विजय जाधव | ६७ | ६७ | ५६ | ५२ | ४२ | ६४ | ३०६ | ६१.२० |
| १४ | पुजा संतोष धादवड | ७० | ७२ | ५३ | ४० | ४६ | ५७ | २९८+२ | ६०.०० |
| १५ | वैशाली बारकु केंगले | ४३ | ५१ | ४० | ३९ | ४२ | ५२ | २२८ | ४५.६० |

वसतीगृहातील इ. १० वी तील खालील यशस्वी मुलींचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र | मुलीचे नाव | तपशील |
|---|---|---|
| १ | कु. उज्वला मालु बरकडे, | मुक्तादेवी विद्यालयात द्रितीय क्रमांक तसेच गणित व विज्ञान विषयात प्रथम क्रमांक |
| २ | कु. मंगल विलास किर्वे | मुक्तादेवी विद्यालयात तृतीय क्रमांक तसेच हिंदी विषयात प्रथम क्रमांक |
| ३ | कु. गौरी तानाजी जोशी | मुक्तादेवी विद्यालयात चतुर्थ क्रमांक |
| ४ | कु. साक्षी नामदेव माळी | मराठी विषयात विद्यालयात प्रथम क्रमांक |

दि. २४ जुन २०२३ रोजी मुक्तादेवी विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमास वसतीगृहातील सर्व स्टाफ उपस्थित होता. वसतीगृहातील उज्वला मालु बरकडे, कु. गौरी तानाजी जोशी, कु. मंगल विलास किर्वे यांचा विद्यालयात सत्कार करण्यात आला व याच दिवशी श्री नवनाथ हुले, श्री सुनिल पिंगळे, यांच्यासोबत श्री उदयसिंह चौधरी यांनी सेमी इंग्लिश विषयी चर्चा केली.



**नविन प्रवेश :**

वसतीगृहातील रिक्त मुलींच्या जागी नविन मुलींच्या प्रवेशाकरिता दि. ११ मे २०२३ रोजी संस्थेचे ज्ञानदा प्रशिक्षण केंद्र डिंभे याठिकाणी मुली व पालक यांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या त्यानुसार या शैक्षणिक वर्षात खालील नविन २२ मुलींना वसतीगृहात प्रवेश देण्यात आला आहे.

| अ.क्र. | मुलीचे नाव | गाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | विद्या मारूती पारधी | नारायणगाव | ५ वी |
| २ | वैष्णवी लहु लोहकरे | निगडाळे | ५ वी |
| ३ | तृप्ती बाळासाहेब पारधी | ठाकरवाडी चास | ८ वी |
| ४ | तनया अरूण डामसे | दुधनोली | ५ वी |
| ५ | वैष्णवी किसन बांबळे | बोरघर | ५ वी |
| ६ | वैष्णवी सुभाष शिंगाडे | फळोदे | ५ वी |
| ७ | अनुष्का बाळु मेमाणे | फळोदे | ५ वी |
| ८ | स्वप्नाली प्रकाश पेकारी | सावरली | ५ वी |
| ९ | दुर्गा देवराम वडेकर | पिपरी पाटण | ५ वी |
| १० | कल्याणी दत्ता लवाटे | पळशी | ५ वी |
| ११ | तनया श्रीधर आंबेकर | कान्हेवाडी | ५ वी |
| १२ | प्राजक्ता बाळासाहेब पोटे | बोरघर | ५ वी |
| १३ | अनुष्का संदिप भारमळ | फुलवडे | ६ वी |
| १४ | साक्षी सुदाम ढेंगळे | सुकाळवेढे | ६ वी |
| १५ | श्रेया राजेंद्र पारधी | ठाकरवाडी चास | ६ वी |
| १६ | कोमल दिनेश काळे | ठाकरवाडी चास | ७ वी |
| १७ | सुप्रिया दिनेश काळे | ठाकरवाडी चास | ७ वी |
| १८ | सारिका गुलाब जाधव | ठाकरवाडी चास | ८ वी |
| १९ | अपेक्षा संदिप जाधव | ठाकरवाडी चास | ६ वी |
| २० | शितल दत्ता लवाटे | पळशी | ८ वी |
| २१ | ज्योती निवृत्ती केदार | संगमनेर | ७ वी |
| २२ | उज्वला मालू बरकडे | पळशी | ११ वी |

वसतीगृहातील इ. ५ वी तील विद्यार्थी कु. वैष्णवी किसन बांबळे राहणार बोरघर या मुलीचा वारंवार कान दुखत असल्याने तिच्या पालकांच्या निर्णयानुसार दि. २२ ऑगस्ट २०२३ पासुन या मुलीचा प्रवेश रद्द करण्यात आला आहे.

**शैक्षणिक इतर बाबी :**

इ. ९ वी तील मुलींचे इ. १० वी करिता जादा उन्हाळी तासीका वर्ग विद्यालयामार्फत दि. १८ एप्रिल २०२३ ते २ मे २०२३ या कालावधीत घेण्यात आले. या तासीकांची वेळ स. ११ :०० ते दु. ३:४५ इतकी होती.

दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी वसतीगृहातील एकुण २५ मुलींना विद्यालयातील स्नेहबंध समितीमार्फत मोफत शालेय गणवेश वाटप करण्यात आले होते.

दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी श्री मुक्तादेवी विद्यालयात इ. १० तील सर्व मुलींनी मिळुन शिक्षक दिन साजरा केला इ. १० वी तील मुलींनी संध्याकाळी वसतीगृहात आपला दिवसभराचा अनुभव इतर मुलींना सांगितला.

दि. २२ सप्टेंबर २०२३ रोजी विद्यालयात घेतलेल्या खालील विविध स्पर्धेत वसतीगृहातील मुलींनी सहभाग घेतला होता. स्पर्धा व सहभागी झालेल्या मुलींची संख्या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिंडी | – | १० मुली | झांजपथक | – | १२ मुली |
| निबंध स्पर्धा | – | ३० मुली | रांगोळी स्पर्धा | – | २५ मुली |
| लेझीम स्पर्धा | – | १० मुली | | | |





या विविध स्पर्धेत वसतीगृहातील ज्या मुलींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी खालील मुलींनी स्पर्धेत यश मिळविल्याने त्यांचा विद्यालयामार्फत प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता.

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अनुष्का संदिप भारमळ | ६ | निबंध स्पर्धा उत्तेजनार्थ |
| २ | अनुष्का बाबु मेमाणे | ५ | रांगोळी स्पर्धेत ३ री |
| ३ | साक्षी रामा उंडे | ६ | फुलदाणी बणविणे स्पर्धेत ३ री |
| ४ | समिक्षा रामा उंडे | ७ | रांगोळी स्पर्धेत २ री |
| ५ | श्रुती सखाराम बोकड | ७ | वकृत्व स्पर्धेत २ री |
| ६ | अनिता मालु बरकडे | ९ | रांगोळी स्पर्धेत ३ री |
| ७ | पुनम रघुनाथ सुपे | १० | वकृत्व स्पर्धेत १ ली |

दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजी इ. ५ वी तील मुलींची, दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजी इ. ६ वी ७ वी च्या मुलींची तर दि. १६ सप्टेंबर २०२३ रोजी इ. ८ वी च्या मुलींची पालक मिटींग विद्यालयात घेण्यात आली होती.

दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी श्री. मुक्तादेवी विद्यालयात मा. शरद पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये वसतीगृहात अनेक मुलींनी सहभाग घेतला होता. विजेत्या मुलींना प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देण्यात आली. वसतीगृहातील विजेत्या मुलींची यादी खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | इयत्ता | तपशील |
|---|---|---|---|
| लहान गट | | | |
| १ | अनुष्का बाळु मेमाणे | ५ वी | मॅरेथॉन प्रथम क्रमांक |
| २ | तनया अरूण डामसे | ५ वी | लांब उडी प्रथम क्रमांक |
| ३ | कल्याणी लक्ष्मण गवारी | ७ वी | गोळा फेक द्रितीय क्रमांक |
| ४ | ज्योती निवृत्ती केदार | ७ वी | मॅरेथॉन द्रितीय क्रमांक |
| ५ | समिक्षा तबाजी पारधी | ७ वी | खो–खो विजेता संघ |
| ६ | अमृता रोहीदास घोटकर | ७ वी | गोळा फेक प्रथम क्रमांक, उंचउडी तृतीय क्रमांक |
| ७ | अनुष्का दिगंबर पारधी | ७ वी | १०० मी धावणे प्रथम क्रमांक, उंचउडी द्रितीय क्रमांक, लांबउडी तृतीय क्रमांक |
| मोठा गट | | | |
| १ | शितल दत्ता लव्हाटे | ८ वी | मॅरेथॉन प्रथम क्रमांक |
| २ | अनिता मालु बरकडे | ९ वी | मॅरेथॉन तृतीय क्रमांक |
| ३ | सारिका दत्तात्रय केंगे | ९ वी | उंच उडी तृतीय क्रमांक |
| ४ | ज्योती रामदास शेळकंदे | ९ वी | खो–खो विजेता संघ |
| ५ | प्रणाली कृष्णा चिमटे | १० वी | उंच उडी द्रितीय क्रमांक, कबड्डी विजेता संघ |
| ६ | पुनम रघुनाथ सुपे | १० वी | गोळा फेक द्रितीय क्रमांक |
| खुला गट | | | |
| १ | समिक्षा रामा उंडे | ७ वी | रांगोळी प्रथम क्रमांक |
| २ | सोनम रविंद्र जाधव | ७ वी | रांगोळी तृतीय क्रमांक |
| ३ | सानवी संतोष धादवड | ९ वी | रांगोळी तृतीय क्रमांक |





श्री. मुक्तादेवी विद्यालयाची शैक्षणिक सहल दि. १९ जानेवारी ते २० जानेवारी २०२४ या कालावधीत कोकण भागात नेण्यात आली होती. वसतीगृहातील एकुण ५३ मुली या सहलीला गेल्या होत्या.

दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी वसतीगृहातील इ. १० वी तील मुलींचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला तर याच दिवशी श्री. मुक्तादेवी विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये इ. ५ ते इ. ९ वी तील मुलींनी खालील रेकॉर्ड गाण्यांमध्ये सहभाग घेऊन नृत्यकला सादर केल्या.





## २. आरोग्य तपासणीः

आरोग्याच्या दृष्टिकोनातुन मुलींना आजाराची लक्षणे दिसल्यास वेळोवेळी डॉक्टरांकडे नेऊन तपासणी करून उपचार केले जातात. दि. २७ जुलै २०२३ रोजी डॉ. गोमती काण्णव यांनी वसतीगृहास भेट देऊन वसतीगृहातील आजारी असलेल्या एकुण १२ मुलींची तपासणी करून औषधोपचार केले.

## ३. वसतीगृहास भेट व देगणी :

दि. ११ एप्रिल २०२३ रोजी संस्थेचे विश्वस्त श्री अरूण गुजर सो, अकौंट ऑफसर श्री. सागर मिटकरी सो. यांनी वसतीगृहास भेट देऊन पाहणी केली.

संस्थेच्या फार्मसी मध्ये कार्यरत असलेले श्री. मिलींद कुंबोजकर, सौ. मीनल कुंबोजकर व श्री. संजय कामठे यांनी वसतीगृहास सदिच्छा भेट दिली.

दि. २७ एप्रिल २०२३ रोजी भारत फोर्ज कं च्या सिएसआर विभाग प्रमुख मा. डॉ लिना देशपांडे मॅडम यांनी वसतीगृहास भेट दिली त्यांच्या समवेत भारत फोर्ज कं. सिएसआर विभागाचे श्री जयदिप लाड, संस्थेचे विश्वस्त श्री अरूण गुजर सो, अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. यांनी वसतीगृहास भेट देऊन पाहणी केली. श्री. अरूण गुजर सर यांनी वसतीगृहातील काही किरकोळ दुरूस्तीची कामे करून घेण्यास सांगितली आहेत.

संस्थेच्या नारोडी येथील जुन्या बालगृहातील विद्यार्थी श्री. विजय देवताडे यांनी दि. ५ एप्रिल २०२३ रोजी वसतीगृहास भेट दिली.

दि. २६ जुन २०२३ रोजी विद्यालयात भारत कृषि सेवा यांच्यामार्फत प्रत्येकी ६ वह्यांचे (२०० पेजेस) वाटप करण्यात आले आहे. तसेच मा. मनोहर जंबुकर सर यांनी सर्व मुलींना टॉवेल, टिफिनबॅग, रूमाल, कापडी पिशवी यांचे वाटप केले. तर दि. २७ जुन २०२३ रोजी स्नेहबंध समिती यांच्यातर्फे प्रत्येक मुलीस ६ वह्यांचे (१०० पेजेस) वाटप करण्यात आले आहे.



दि. २५ जुलै २०२३ रोजी वसतीगृहास सोशल हेल्थ फाऊंडेशन व साई प्रतिष्ठाण, मंचर यांच्या कार्यकर्त्यांनी वसतीगृहास भेट दिली. यावेळी मॅक्सकेअर हॉस्पिटलच्या डॉ. मंजुश्री जाधव यांनी मुलींना मासिक पाळी विषयी मार्गदर्शन केले. तसेच मुलींना २०० पॅड व बिस्किट पुडे देण्यात आले. या कार्यक्रमासाठी सोशल हेल्थ फाऊंडेशन चे श्री. योगेश चिखले, साई प्रतिष्ठाण चे ऋषि थोरात, मॅक्स केअर हॉस्पिटलच्या सौ. स्नेहा हिंगे, नारोडीतील आरोग्य सेविका सौ योगिता आडवळे, सोनाली जंबुकर, अनिता तोत्रे इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. स्नेहल तुरे हिने तर सर्वाचे आभार सौ अश्विनी चव्हान यांनी मानले.

दि. १३ ऑगस्ट २०२३ रोजी संस्थेच्या रूग्णालयात कार्यरत असणारे श्री. जोगदंड व त्यांचे कवी मित्र श्री. देवेंद्र येवडे यांनी वसतीगृहास भेट दिली व मुलींना त्यांच्या कविता ऐकविल्या.

दि. १४ ऑगस्ट २०२३ रोजी श्री. सागर मिटकरी यांनी आपल्या परिवारासह वसतीगृहास भेट दिली व सर्व मुलींना खाऊ वाटप केला.

दि. १९ ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. दादा गुजर इंग्लिश मिडीअम स्कुल, हडपसर येथील शिक्षकांनी वसतीगृहास भेट दिली. व मुलींसोबत गाणी, कविता, कोडी, विनोद ऐकवित गप्पागोष्टी केल्या.

दि. २४ ऑगस्ट २०२३ रोजी सेवा सहयोग, पुणे यांच्यातर्फे मुक्तांगण वसतीगृहातील सर्व ६४ मुलींना प्रत्येकी १-दप्तर, १०० पेजेस एकुण ९ वह्या, १ आलेख वही, १ कंपासपेटी, १ तेल खडु बॉक्स व १ गोष्टीचे पुस्तक याप्रमाणे शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देण्यात आले आहे. सर्व मुलींना हे साहित्य खूप उपयुक्त ठरत आहे.



दि. ४ सप्टेंबर रोजी महात्मा गांधी विद्यालय, मंचर चे श्री. उपार सर व सौ. स्वाती उपार मॅडम तसेच डॉ. राजीव काळे व भाग्यश्री काळे यांनी वसतीगृहास सदिच्छा भेट दिली.

दि. २५ सप्टेंबर २२३ रोजी सह्याद्री मार्ट, घोडेगाव च्या सौ अक्षदा अनिकेत कुदळे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी वसतीगृहातील मुलींकरिता **६० चारेघी वह्या तसेच ५०० पेन** भेट दिले.

दि. ३ नोव्हेंबर २०२३ रोजी शाश्वत संस्थेचे मा. राजवाडे, सौ. अनघा ठोंबरे, सौ. विजया जोशी, मा. आशोक आढाव आदी मान्यवरांनी वसतीगृहास सदिच्छा भेट देऊन वसतीगृहातील सर्व मुलींसोबत गप्पा गोष्टी केल्या व मुलींना कुर्ता, दिवाळी फराळ, साबण, रियुजेबल सॅनिटरी नॅपकीन पॅड इ. चे वाटप केले.




दि. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी कमिन्स कंपनीचे श्री. विकास साळवे व श्री. सचिन जोशी यांनी वसतीगृहास सदिच्छा भेट दिली व सौर उर्जा प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत संस्थेचे आकौंट ऑफिसर श्री सागर मिटकरी उपस्थित होते.

दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी संस्थेचे उपसचिव श्री. अरूण गुजर सर, अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सर यांनी वसतीगृहास भेट देऊन पाहणी केली. यावेळी प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे हेही उपस्थित होते.



दि. ६ जानेवारी २०२४ रोजी मौजे अवसरी येथील कु. मयंक अभिजित पिंगळे (वय १ वर्ष) यांचा प्रथम वाढदिवस त्याच्या कुटुंबियांनी वसतीगहातील मुलींच्या समवेत साजरा केला. यावेळी पिंगळे कुटुंबियांनी वसतीगृहातील मुलींना रंगपेटी, पेन व वह्या भेट दिल्या.



दि. ७ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे मा. सागर मिटकरी, डॉ. महाजन व मा. सतीश राव (शास्त्रज्ञ इस्त्रो), संतोष पिसे यांनी मुक्तांगण वसतीगृहास भेट दिली. मा. सतिश राव यांनी मुलींना सुर्य, दिनमान, नविन वर्ष याबद्दल माहिती सांगितली. मा. संतोष पिसे यांनी मुलींना अनमोल मार्गदर्शन केले व रोज सुर्याचे निरिक्षण करून त्याचा फोटो बणविण्याचे काम दिले.

दि. २० जानेवारी २०२४ रोजी पुणे येथील फिनास्त्रा या आय टी कंपनीतील अधिकाऱ्यांनी मुक्तांगण वसतीगृहास भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी वसतीगृहातील मुलींच्या राहण्याची व्यवस्था, डिवॅट प्रकल्प, गरम पाणी सौरउर्जा प्रकल्प, सौरउर्जा, परसबाग इ. पाहणी केली. उपस्थित मुलींसोबत चर्चा केली व त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमांची माहिती घेतली तसेच मुलींना विविध पुस्तके भेट दिली.




दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी शाश्वत संस्थांच्या अधिकाऱ्यांनी वसतीगृहास सदिच्छा भेट दिली व यावेळी त्यांनी मुलींना कोल्ड्रींगसचे (फ्रुटी) वाटप केले.

**प्रशिक्षणे :**

मुलींच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातुन दि. २८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ या कालावधीत सर्व मुलींकरिता योगा प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षक म्हणुन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या श्रीमती अनुजा गायतोंडे व सुरेखा भालेराव उपस्थित होत्या. अनुजा गायतोंडे यांनी इ. ९ वी तील ११ मुलींना मेधा योगा चे प्रशिक्षण दिले, तर सुरेखा भालेराव यांनी ५ वी ते ८ वी पर्यंतच्या नविन २२ मुलींना उत्कर्षा योगाचे प्रशिक्षण दिले. याप्रमाणे एकुण ३३ मुलींना योगाचे प्रशिक्षण दिले. उर्वरित सर्व मुलींनी पुर्वी शिकलेल्या योगाचा सराव केला. सर्व मुली दरोराज योगा करतात.




दि. २३ मार्च २०२४ रोजी फिनास्त्रा कंपनीचे मा. सुमित कुलकर्णी, कल्पी , पल्लवी, व धनश्री पाटील यांनी मुक्तांगण वसतीगृहास भेट देऊन इ. १० वी तील मुलींना करिअर विषयी अनमोल मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी मुलींना अभियांत्रिकी, पदविका, एमपीएससी/युपीएससी स्पर्धा परिक्षा, एम एस सी आय टी, टायपिग इ. विषयासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी वसतीगृहातील सर्व मुलींना खाऊचे वाटप केले.




**सण/उत्सव :**



दि. २१ जुन २०२३ रोजी सर्व मुलींनी योगाचे विविध प्रकार करून जागतिक योगा दिन साजरा केला.

दि. ३ जुलै २०२३ वसतीगृहामध्ये गुरूपौर्णिमा दिन साजरा करण्यात आला. यावेळी वसतीगृहातील एकुण २० मुलींनी गुरूंविषयी आपली मनोगते व्यक्त केली.

हर घर तिरंगा या कार्यक्रमांतर्गत दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत वसतीगृहात ध्वज फडकविण्यात आला. दि. १५ ऑगस्ट २०२३ या स्वातंत्रदिनाच्या दिवशी डॉ. गोमती काण्णव यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या दिवशी एकुण १० मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.



दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. दादा गुजर यांच्या जयंती निमित्त डॉ. दादांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

दि. २१ ऑगस्ट २०२३ रोजी वसतीगृहात नागपंचमी हा सण साजरा करण्यात आला तर दि. ३० ऑगस्ट २०२३ रोजी वसतीगृहात रक्षाबंधन हा सण साजरा करण्यात आला. या निमित्तने सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले.



दि. ७ सप्टेंबर २०२३ राजी वसतीगृहात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. इ. ५ वी तील कु. तनया डामसे या मुलीने दहीहंडी फोडली. इ. ८ वीतील मुलींनी दहीहंडी रंगविण्याचे काम केले तर इ ९ वी तील मुलींनी दहीहंडी सजविण्याचे काम केले. सर्वं मुलींनी हा उत्सव आनंदात साजरा केला.



वसतीगृहात प्रथमच गणेशोत्सव साजरा करण्यात आला. इ. १० वी तील सर्व मुलींनी सजावटीचे काम पाहीले. दि. १९ सप्टेंबर २०२३ रोजी गणपती बाप्पाच्या मुर्तींची स्थापना करण्यात आली. रोज ५ दिवस नित्यनेमाने गणपतीची पुजा व आरती करण्यात आली. दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी घोड नदीत गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी वसतीगृहात महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी एकुण १५ मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.



दि. २४ ऑक्टोबर २०२३ रोजी वसतीगृहात दसरा हा सण साजरा केला या दिवशी मुलींनी वसतीगृहातील शेतीची अवजारे मुलींची वह्या पुस्तके, संगणक, शिलाई मशिन इ. पुजा करण्यात आली.

दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी वसतीगृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. वसतीगृहातील एकुण १५ मुलींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. मनिषा केंगले हिने तर आभार कु. निलम पारधी हिने मानले.

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी वसतीगृहात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. एकुण १५ मुलींनी सावित्रीबाई यांच्या विषयी आपली मनोगत व्यक्त केले. दि. १२ जानेवारी २०२४ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ही एकुण १० मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.



दि. १५ जानेवारी २०२४ रोजी वसतीगृहामध्ये मकर संक्रांती हा सण साजरा करण्यात आला. यावेळी सर्व मुलींनी एकमेकांना तिळगुळचा वाटप केला.

दि. २६ जानेवारी २०२४ रोजी वसतीगृहात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मुलींनी सुबक रांगोळी काढली. श्री. नामदेव यमाजी घोईरत यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला.

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी वसतीगृहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी एकुण २० मुलींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपली मनोगते व्यक्त केली. इ. ७ वी तील मुलींनी एकच राजा इथे जन्मला हे गीत तर इ. १० वी तील मुलींनी दैवत छत्रपती न आमचे दैवत छत्रपती हे गीत सादर केले.



दि. ८ मार्च २०२४ रोजी वसतीगृहात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या दिवशी एकुण १५ मुलींनी राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, सुनिता विल्यम, किरण बेदी, लता मंगेशकर, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इ. महिलांच्या कर्तुत्वाची माहिति सांगितली. कु. निलम पारधी हिने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर कु. सानिका भांगरे हिने उपस्थित सर्वाचे आभार मानले.

दि. २४ मार्च २०२४ या दिवशी वसतीगृहामध्ये होळी सण साजरा करण्यात आला. वसतीगृह परिसरातील पालापाचोळा गोळा करून इ. १० वी च्या मुलींच्या हस्ते होळी पेटविण्यात आली व सर्व मुलींना पुरणपोळीचे गोड जेवण देण्यात आले होते.

**देखभाल/दुरूस्तीः**

सिसिटीव्ही करिता पॉवर सप्लाय खराब झाल्याने माहे एप्रिल २३ मध्ये नविन पॉवर सप्लाय तसेच स्टॅबिलायझर बसविण्यात आला आहे.

वसतीगृहातील ५ अग्निशामक सिलेंडर दि. १० एप्रिल २०२३ रोजी शिवकृपा एन्टरप्रायजेस यांच्याकडुन भरून घेण्यात आले आहेत



माहे मे २०२३ मध्ये संगणक कक्षामागील टॉयलेट बाथरूम वरील छप्पर दुरूस्ती करण्यात आली. तसेच स्टडी टेबल दुरूस्ती करण्यात आले. तसेच डीवॅट वरील मोटार पुर्णतः खराब झाल्याने नवीन मोटार (टेक्स्मो १ एचपी) खरेदी करण्यात आली आहे.

अहवाल कालावधीत वसतीगृहातील रेन वाटर हार्वेस्टिंग दुरस्तीचे काम करण्यात आले. तसेच वाळलेली झाडे तोडण्यात आली. व इतर किरकोळ दुरूस्ती करण्यात आली.



माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये वसतीगृहातील ३ टॉयलेटचे दुरूस्तीचे काम करण्यात आले. नविन गॅस पाईपलाईनचे काम करण्यात आले आहे.

**४. इतर :**

वसतीगृहाकरिता जुने संगणक मिळावे, याकरिता सिनेक्रॉन टेक्नोलॉजी प्रा. लि. पुणे यांच्याकडे दि. ५ एप्रिल २०२३ रोजी मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

दि. ६ एप्रिल २०२३ रोजी नारोडी गावची यात्रेनिमित्ताने सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

दि. १९ एप्रिल २०२३ रोजी मुक्तादेवी विद्यालयाकडुन इ. ५ वी ते इ. ८ वी च्या मुलींकरिता एकुण ३५ किलो तांदुळ वसतीगृहास मिळाले.

माहे एप्रिल २३ मध्ये वसतीगृहाकरिता एकुण ४० किलो मसाला बनवुन घेण्यात आला आहे.

दि. १० मे २०२३ पासुन वसतीगृह कर्मचारी श्री. फसाबाई घोईरत व वत्सला तळपे यांना सुट्टी देण्यात आली होती. दि. ११ मे २०२३ पासुन कर्मचारी नामदेव घोईरत यांना दि. २० तारखेपर्यंत सुट्टी देण्यात आली होती. तसेच दि. २१ मे २२०२३ पासुन अधिक्षिका श्रीमती अश्विनी चव्हाण यांना सुट्टी देण्यात आली आहे.

अहवाल कालावधीत वसतीगृहातील मुलींच्या जुन्या वह्यांची एकुण १५० किलो रद्दी विकली. प्रति किलो रू. १५ प्रमाणे एकुण रू. २२५०/– वसतीगृहात जमा करण्यात आले.

दि. ५ जुन २०२३ रोजी श्रीमती अश्विनी चव्हाण वसतीगृहात कामावर उपस्थित झाल्या. तसेच दि. ११ जुन २०२३ रोजी वसतीगृहातील सर्व स्टाफ कामावर हजर झाला.

दि. २० जुलै २०२३ रोजी मुलींनी श्रमदान करून वसतीगृहातील शेतात घेवडा, चवळी, मिरची, मुळा, काळेवाल इ. बियाणांची लागवड करण्यात आली.

माहे जुलै २०२३ रोजी वसतीगृहास सोशल हेल्थ फाऊंडेशन, मंचर व साई प्रतिष्ठाण, चांडोली यांच्यातर्फे २७ झाडे देण्यात आली होती. दि. ४ ऑगस्ट २०२३ रोजी मुलींनी या सर्व झाडांची लागवड केली आहे.





दि. १ ऑक्टोबर २०२३ रोजी वसतीगृहात ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. वसतीगृह परिसरात साफ–सफाई करण्यात आली व गवत काढण्यात आले.

दि. ६ ऑक्टोबर २०२३ रोजी गोमया ऑरगॅनिक कंपनीकडुन पिण्याच्या पाण्याचा नविन फिल्टर खरेदी करून किचन मध्ये बसविण्यात आला आहे.

माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये परसबागेतुन केळी–१८५ नग, चिक्कु–१५० नग व १.५० किलो मिरचीचे उत्पादन घेण्यात आले.

दि. ८ नोव्हेंबर २३ पासुन श्रीमती अश्विनी चव्हान, वत्सला तळपे व सौ फसाबाई घोईरत यांना दिवाळीची सुट्टी देण्यात आली होती तर दि. १७ नोव्हेंबर २३ पासून श्री. नामदेव घोईरत यांना दिपावलीची सुट्टी देण्यात आली होती. दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी सर्व कार्यकर्ते वसतीगृहात हजर झाले.




वसतीगृहातील मुलींना गालफुगी व कांजण्याची साथ आल्याने इ. ५ वी ते इ. ९ वी पर्यंतच्या सर्व मुलींना दि. १९ डिसेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत आपआपल्या घरी सोडण्यात आले होते.

दि. १ डिसेंबर २०२३ रोजी वसतीगृहातील सीसीटीव्ही ची सर्व्हिसिंग करण्यात आली व सीसीटीव्ही चे कनेक्टर व केबल बदलण्यात आली.

दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी श्री. सागर मिटकरी यांच्या मुलीचा जन्मदिन असल्याने त्यांच्यामार्फत वसतीगृहातील सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

माहे डिसेंबर २०२३ मध्ये वसतीगृहातील शेतातुन ३ किलो मिरचीचे उत्पादन घेण्यात आले.

माहे जानेवारी २०२४ मध्ये वसतीगृहातील शेत रोटरण्यात आले व त्यामध्ये धना, मेथी, काळेवाल, गवार, भेंडी, हरभरा इ. बियाणांची लागवड करण्यात आली .



माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये वसतीगृहात नविन ४ सोलर लाईट्स बसविण्यात आल्या. तसेच नविन ४ सिसिटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले आहेत.

माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये वसतीगृहाकरिता एकुण ५२ किलो ४०० ग्रॅम इतका मसाला बनविण्यात आला आहे.

वसतीगृहाच्या शेतातुन माहे फेब्रुवारी २०२४ घेवड्याच्या ४ किलो शेंगा तसेच मेथीच्या भाजीच्या ३६ जुड्या काढण्यात आल्या.

वसतीगृहाच्या शेतातुन माहे मार्च २०२४ मध्ये घेवड्याच्या १० किलो शेंगांचे तर ८ किलो शेवग्याच्या शेंगांचे उत्पादन घेण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण वसतीगृह, नारोडीचा सन २०२३-२४ चा वार्षीक अहवाल देत आहोत. कळावे,

**आपला विश्वासू ,**

**श्री. सुरेश काळे**
**(प्रकल्प समन्वयक)**